पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

14 वर्ष वर्धापन दिन

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३२६ ■ शुक्रवार, दि.५ जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# महापालिका हद्दीत 'ओपन स्पेस' चा घोटाळा

## 50 ओपन स्पेस सापडेना, 130 ओपन स्पेसचे नकाशे गायब

प्रतिनिधी ५ जून




**अकोला:** शहरातील नागरिकांच्या हक्काच्या मोकळ्या जागांवर, म्हणजेच 'ओपन स्पेस' वर भूमाफिया आणि प्रशासकीय आशीर्वादाने दरोडा टाकल्याचा एक अत्यंत खळबळजनक प्रकार 'सिटी न्यूज सुपरफास्ट'च्या हाती आलेल्या विशेष कागदपत्रांवरून उघडकीस आला आहे.

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील शेकडो लेआऊट मधील ५० पेक्षा जास्त मोकळ्या जागा अर्थात ओपन स्पेस प्रत्यक्ष जमिनीवरून गायब झाल्या आहेत, तर १३० पेक्षा जास्त जागांचे नकाशेच महापालिका आणि संबंधित प्रशासकीय यंत्रणेच्या दप्तरी उपलब्ध नाहीत. नागरिकांच्या ऑक्सिजन झोनवर, लहान मुलांच्या खेळण्याच्या मैदानांवर आणि ज्येष्ठ नागरिकांच्या विरंगुळ्याच्या जागांवर डल्ला मारणारा हा अकोल्याच्या इतिहासातील सर्वात मोठा जमीन घोटाळा मानला जात आहे.

### अकोल्याच्या हक्काच्या जागांवर डल्ला कोणी मारला ?

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील ओपन स्पेस चा अधिकृत सरकारी माहितीचा कच्चा चिठ्ठा जेव्हा 'सिटी न्यूज सुपरफास्ट'ने उपसला, तेव्हा थक्क करणारी आणि संतापजनक आकडेवारी समोर आली आहे. सरकारी कागदपत्रांमध्ये अकृषक आदेश झालेले आहेत, पण प्रत्यक्षात ओपन स्पेस च्या जागा कुठे आहेत, याचे उत्तर ना महापालिकेकडे आहे ना भूमि अभिलेख विभागात. शासकीय कागदावर 'ओपन स्पेस' असे लिहिल असले तरी प्रत्यक्षात मात्र ओपन स्पेस घटनास्थळावर सापडल्या नाहीत. महापालिका प्रशासनाने अधिकृतपणे ४६८ लेआऊट पैकी पन्नास 'ओपन स्पेस सापडली नाही' अशी नोंद खुद्द एका पाहणीत समोर आली आहे. या ओपन स्पेस भुमाफियांनी कोणाला विकल्या असा प्रश्न आता विचारला जात आहे.

### १३० ओपन स्पेसचे नकाशा गायब

अकोला महापालिकेच्या हद्दीतील ४६८ लेआऊट पैकी ५० ओपन स्पेस सापडल्या नाहीत. आणि १३० ओपन स्पेस चे नकाशे गायब आहे. म्हणजे काय तर या पण, ओपन स्पेस विकल्या गेल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. महसुल यंत्रणा, महापालिका आणि भूमि अभिलेख या विभागाचे कोण या ओपन स्पेस घोटाळयात सहभागी आहे अशी विचारणा सुरु झाली आहे. नकाशाच सापडत नसल्यामुळे भूमाफियांना मोकळया जागांवर बेकायदेशीर बांधकामे करणे किंवा प्लॉट पाडून विकणे सोपे झाले आहे. शिलोडा, हिंगणा-म्हैसपूर, डाबकी, उमरी, कौलखेड आणि खडकी बु. सारख्या मुख्य भागांतील शेकडो सर्व्हे क्रमांकांचे नकाशे गायब आहेत.

### शेतजमीन ते लेआऊट चा प्रवास

शेतजमीनीचे लेआऊट टाकताना उपविभागीय अधिकारी, भूमि अभिलेख आणि महापालिका या तीन विभागाचा संबंध येतो. शेतजमीनीचे बिगर शेत जमीन करणे (एन.ए.) करणे हे करताना भूमि अभिलेख रस्ते, नाल्या, ओपन स्पेस आखून देते. २००२ पुर्वी उपविभागीय अधिकारी (एस.डी.ओ) आणि तदनंतर महापालिका आयुक्त हे ओपन स्पेस निश्चिती करत होते. असे असताना ५० ओपन स्पेस गायब होणे आणि १३० चे नकाशे महापालिकेला प्राप्त न होणे या मोठ्या घोटाळयात कोण सहभागी आहे. एखाद्या लेआऊटच्या दहा टक्के जागा ओपन स्पेससाठी राखीव असताना ती जागा कोणी कोणाला विकली हा शोधाचा विषय असून यात कोट्यावधीचे व्यवहार झाल्याची दाट शक्यता असून महापालिका नगर रचनाकार या सर्व प्रकरणात सर्व संबंधितांवर शासनाची फसवणूक व स्थानिक प्लॉटधारक नागरीकांच्या ओपन स्पेस चोरीचा गुन्हा दाखल करेल काय अशी विचारणा आता होत आहे.

### ते विकासक आणि खरेदीदार कोण

जेव्हा एखादा विकासक किंवा जमीन मालक शेतजमिनीचे प्लॉट पाडतो, तेव्हा तिथे सार्वजनिक वापरासाठी 'ओपन स्पेस' म्हणून सोडणे आणि ती महापालिकेकडे हस्तांतरित करणे बंधनकारक असते. परंतु, अकोल्यात एन.ए. आदेश झाले, प्लॉट विकून विकासक / बिल्डरांनी कोट्यवधी रुपये कमावले; पण जेव्हा महापालिकेने या जागांचा ताबा घेऊन तिथे विकास करणे गरजेचे होते, तेव्हा तिथे मोकळी जागाच शिल्लक राहिलेली नाही. काही ठिकाणी खुलेआम अतिक्रमण करून इमारती आणि पक्की बांधकामे उभारण्यात आली आहेत. महापालिका हद्दीतील १३० नकाशे गहाळ होण्यामागे महापालिकेतील कोणत्या बड्या अधिकाऱ्यांचा हात आहे ?. अशी विचारणा आता होत आहे. महसुल यंत्रणा, महापालिका आणि भूमि अभिलेख या विभागाचे कोण या ओपन स्पेस घोटाळयात सहभागी आहे अशी विचारणा सुरु झाली आहे. अकोलेकरांच्या हक्काच्या जमिनी गिळंकृत करणाऱ्या या भूमाफियांची आणि त्यांना पाठिशी घालणारे कोण, या महाघोटाळयाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# सलग तिसऱ्यांदा रेपो रेट जैसे थे !

## गव्हर्नर संजय मल्होत्रा यांची घोषणा, गृहकर्जदारांना दिलासा

प्रतिनिधी ५ जून



**मुंबई :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर संजय म्हलोत्रा यांनी पतधोरण विषयक समितीच्या बैठकीनंतर रेपो रेट जाहीर केला. यावेळी त्यांनी गेल्या काही महिन्यात युद्धांमुळे निर्माण झालेली अनिश्चितता यासंदर्भात भाष्य केलं. सध्या निर्माण झालेल्या आर्थिक स्थितीचे सखोल विश्लेषण केल्यानंतर रेपो रेट ५.२५ टक्के कायम ठेवत असल्याचे संजय मल्होत्रा यांनी जाहीर केले. आरबीआयने सलग तिसऱ्यांदा रेपो रेट कायम ठेवत गृहकर्जदारांना दिलासा दिला आहे.

आरबीआयनं पतधोरण विषयक समितीच्या बैठकीत रेपो रेट स्थिर ठेवला आहे. आरबीआयचे गव्हर्नर संजय म्हलोत्रा यांनी जागतिक पातळीवर भूराजनैतिक संघर्षामुळे निर्माण झालेली अस्थिरता, सप्लाय चेनमध्ये निर्माण झालेले अडथळे आणि दबाव याशिवाय ऊर्जा साधनांचे वाढलेले दर याचा परिणाम विकासाच्या वेगावर झाला असून महागाईच्या अंदाजात वाढ झाल्याचं पाहायला मिळत आहे. पुरवठा तुटवड्याचा परिणाम चौथ्या तिमाहीत आणि त्यानंतर देखील कायम राहील. जागतिक संकटानंतर देखील देशातील रिटेल महागाई दर निश्चित टार्गेटच्या खाली असल्याचं देखील सांगण्यात आलं आहे. संजय म्हलोत्रा यांनी म्हटलं की आर्थिक अनिश्चिततांच्या काळात आम्ही आव्हानं पार करुन पुढं जाऊ असा विश्वास आहे. पतधोरण विषयक समिती डेटावर लक्ष ठेवेल, आरबीआयचे गव्हर्नर संजय म्हलोत्रा म्हणाले की पुरवठ्यावरील दबाव आणि इतर घडामोडींवर आमचं लक्ष असेल. सलग तिसऱ्या तिमाहीत न्यूट्रल धोरण स्वीकारत रेपो रेट जैसे थे ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचं म्हलोत्रा यांच्याकडून सांगण्यात आलं.




# विदर्भात पावसाची प्रतीक्षा लांबली !

प्रतिनिधी ५ जून

**नागपूर :** प्रतीक्षा असलेल्या मान्सूनने गुरुवारी केरळात प्रवेश केला व दोन-तीन दिवसांत गोव्यापर्यंत पोहोचत १० जूनपर्यंत महाराष्ट्रात धडक देणार आहे. विदर्भात मात्र आनंदसरींसाठी आणखी काही काळ प्रतीक्षा करावी लागणार असून, तोपर्यंत उकाड्याचा त्रास सहन करावा लागणार आहे. गुरुवारी निरभ्र आकाशात उन्हाच्या चटक्यांनी नागपूरकरांना बेजार केले. यात रात्रीचा उकाडाही वाढला आहे.

हवामान विभागाने २४ तासांत म्हणजे ५ जून रोजी नागपूर जिल्ह्यात गडगडाटासह तुरळक पावसाचा अंदाज वर्तवला आहे. ६ जूनला ढगाळ वातावरण राहील, तर ७ व ८ जून रोजी पुन्हा पावसाची शक्यता वर्तवली आहे. मात्र, ढगाळ वातावरण व पावसाच्या शक्यतेतही तापमान उसळण्याचा व ४३ अंशांच्या जाण्याचा अंदाज आहे. त्यामुळे नागपूरकरांना सध्यातरी उकाड्यापासून दिलासा मिळण्याची शक्यता नाही. उलट, दरवर्षीप्रमाणे जूनच्या वातावरणातील आर्दतायुक्त दमटपणामुळे उकाडा आणखी त्रासदायक होण्याची शक्यता आहे. दरम्यान, गुरुवारी ब्रह्मपुरी येथे देशात सर्वाधिक ४४.२ अंश तापमानाची नोंद झाली.




## केंद्र शासनाच्या अमृत योजनेच्या निधीचा चुराडा

# मजिप्रा, महापालिकेचे दूर्लक्ष

प्रतिनिधी ५ जून

**अकोला:** केंद्र शासनच्या अमृत २.० मध्ये शहरात सुरु असलेली भूमिगत गटार योजना ही भविष्यात अकोल्यासाठी अडचणीची ठरणार आहे. यातून ना पाणी जाईल ना मलबा त्याच बरोबर या योजनेत वस्ती नसलेल्या ठिकाणी सुरु असलेले गटार योजनेच्या कामांची चौकशी केल्यास केंद्र सरकारच्या योजनेच्या निधीचा झालेला गैरवापर अधोरेखित होत असून पुण्यातील कंपनीच्या मनमानी कारभार आणि मजिप्रा, महापालिका यांचे दूर्लक्ष यामुळे कोट्यावधीची भूमिगत गटार योजना अकोल्यात फसण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

ज्या भागात लोकवस्ती नाही अशा राजेश्वर कॉलनी, साई कॉलनी, गोकर्णा कॉलनी जाजू नगर अन्नपुर्णा माता मंदिरामागे थेट गटर योजना राबविण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ज्या भागात लोकवस्ती नाही, नागरिक राहत नाही, मलजल निर्माण होत नाही अशा ठिकाणी कुठल्या आधारावर ही सरकारी योजना राबविली गेली याचा खुलासा पुणे स्थित कंपनी, मजिप्रा, महापालिका का करत नसल्याची ओरड आता होत आहे.

### इलेक्ट्रिकल इंजिनिअरकडे भूमिगत चे काम कसे

या योजनेत भविष्यात लोकवस्ती असलेल्या भागात देखील भुमिगत गटार योजनेचे काम सुरु असल्याचा दावा महापालिका अभियंता अमोल डोईफोडे यांनी केला आहे. इलेक्ट्रिकल इंजिनिअर असलेल्या अमोल डोईफोडे यांच्याकडे या योजनेचा चार्ज कसा काय असा प्रश्न विचारला जात आहे. महापालिकेत कार्यकारी अभियंता हे पद किती वर्षांपासून रिकामे आहे. प्रतिनियुक्तीवर महापालिकेत कार्यकारी अभियंता का येत नाही याची ही विचारणा आता सुरु झाली आहे.






सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
शुक्रवार, दि. ५ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

पर्यावरण संरक्षण आजच्या काळात का आवश्यक आहे ? हा प्रश्न आता केवळ शैक्षणिक चर्चेचा विषय राहिलेला नाही, तर मानवी अस्तित्वाशी निगडित वास्तव बनला आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, नैसर्गिक साधनसंपत्तीवरील वाढता ताण, हवामानातील बदल, पाण्याची टंचाई आणि जैवविविधतेसमोरील आव्हाने यामुळे पर्यावरण संरक्षणाची गरज पूर्वीपेक्षा अधिक तीव्रतेने जाणवत आहे. मानव आणि निसर्ग यांचे नाते परस्परावलंबी आहे. निसर्गाचे संतुलन अबाधित राहिले तरच विकासाची वाटचाल शाश्वत होऊ शकते. म्हणूनच दरवर्षी ५ जून रोजी साजरा होणारा जागतिक पर्यावरण दिन हा केवळ एक दिवस नसून पर्यावरण संरक्षणाच्या सामूहिक संकल्पनेचा जागतिक उत्सव आहे. जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना १९७२ मध्ये स्वीडनमधील स्टॉकहोम येथे भरलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या 'मानवी पर्यावरण परिषदेत ' मांडण्यात आली. त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून घोषित केला आणि १९७३ पासून त्याचे औपचारिक आयोजन सुरू झाले.

# पर्यावरणाचा जागर घराघरातून वाढवू या !

**जागतिक पर्यावरण दिन**

या उपक्रमामागील उद्देश जगभरातील नागरिक, संस्था आणि शासन व्यवस्थांना पर्यावरणाबाबत जागरूक करणे हा होता. आज हा दिवस १५० हून अधिक देशांमध्ये विविध उपक्रमांद्वारे साजरा केला जातो. पर्यावरणाच्या महत्त्वाबाबत जगातील अनेक तज्ज्ञांनी वेळोवेळी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. पर्यावरणवादी आणि संयुक्त राष्ट्रांच्या माजी अहवालांमध्ये ' पृथ्वी ही आपल्याला पूर्वजांकडून मिळालेली संपत्ती नसून पुढील पिढीकडून घेतलेले कर्ज आहे ' हा विचार वारंवार अधोरेखित करण्यात आला आहे. सुप्रसिद्ध पर्यावरण अभ्यासक 'लेस्टर ब्राऊन ' यांनी म्हटले आहे की, 'पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यांना वेगळे करता येत नाही; पर्यावरण कोलमडले तर अर्थव्यवस्थाही टिकणार नाही. तर ज्येष्ठ पर्यावरणवादी 'वंगारी मथाई' यांनी वृक्षलागवडीला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. या विचारांतून पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकारी जबाबदारी नसून लोकसहभागाची चळवळ असल्याचे स्पष्ट होते.

भारतासमोर पर्यावरणासंदर्भात अनेक संधी आणि आव्हाने आहेत. लोकसंख्या वाढ, शहरी विस्तार, पाण्याचे व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन आणि हवामान बदलाच्या परिणामांशी जुळवून घेणे ही महत्त्वाची क्षेत्रे आहेत. महाराष्ट्राच्या संदर्भात पाहिले तर जलस्त्रोतांचे संवर्धन, जंगलांचे संरक्षण, शहरी भागातील हरित क्षेत्र वाढविणे, नदी संवर्धन, मृदा धूप रोखणे, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा या माध्यमातून अक्षय वीज निर्मितीचे लक्ष्य पूर्ण करणे आणि जैवविविधतेचे जतन करणे यांसारख्या बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे या क्षेत्रात अनेक सकारात्मक उपक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाकडे केवळ समस्यांच्या दृष्टीने न पाहता, शाश्वत विकासाच्या संधी म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे. विकासकामे आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हे आधुनिक प्रशासनासमोरील मोठे आव्हान आहे. त्यामुळे कोणत्याही मोठ्या प्रकल्पासाठी पर्यावरणीय परवानगी आवश्यक मानली जाते. यामागील उद्देश विकासाला अडथळा निर्माण करणे नसून, त्या प्रकल्पाचा हवा, पाणी, जमीन, वनसंपदा, वन्यजीव आणि स्थानिक समुदायांवर होणारा परिणाम अभ्यासणे हा आहे. पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (एन्व्हायरमेंट इम्पॅक्ट असेसमेंट ) प्रक्रियेमुळे विकासकामे अधिक जबाबदारीने आणि शाश्वत पद्धतीने राबविणे शक्य




होते. परिणामी विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात संतुलन राखले जाते.त्यामुळे मोठमोठ्या वसाहती निर्माण करताना पाणवठे निर्माण करणे,त्या बाजूला जैवविविधता निर्माण होईल यासाठी जागरूक असणे आवश्यक आहे,असे छोटे प्रयोग प्रामाणिकपणे निर्माण केल्यास विकास आणि पर्यावरण दोन्ही उद्दिष्टे साध्य करता येतात.

महाराष्ट्र शासनाने पर्यावरण संवर्धनासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत.पर्यावरण व हवामान बदल विभाग यासाठी विशेष प्रयत्न करत आहे.लोकसहभागातील पर्यावरण कृती कार्यक्रम, जनतेच्या सहभागासह पर्यावरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. यापूर्वीचे राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी एकाच वर्षी महत्त्वाकांक्षी '५० कोटी वृक्ष लागवड अभियान ' राबविले होते.दरवर्षी राज्य शासन जून - जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड मोहीम राबविते. सध्या बांधावर बांबू लागवडीची एक मोहीम महाराष्ट्रात यशस्वीपणे राबविली जात आहे.राष्ट्रीय बांबू मिशन अंतर्गत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, पर्यावरण संवर्धन करणे,उपजीविका विकासाची संधी देणे आणि बांबू-आधारित उद्योगांना चालना देणे हा बांधावरील बांबू लागवड योजनेचा मुख्य उद्देश आहे. याशिवाय माझी वसुंधरा अभियान, जलयुक्त शिवार अभियान,राज्य तलाव संवर्धन योजना,शेततळे अभियान,गाळमुक्त धरण गाळयुक्त शेती, नाला रुंदीकरण व खोलीकरण योजना,नदी संवर्धन उपक्रम, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे कार्यक्रम, मॅंग्रोव्ह संवर्धन प्रकल्प, तसेच ग्रामीण व शहरी भागांमधील विविध हरित उपक्रमांमुळे पर्यावरण संरक्षणाला चालना मिळत आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख योजनांपैकी एक असणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेतून जलस्त्रोतांमध्ये वृद्धी झाल्याचे सिद्ध झाले आहे.या महत्वाकांक्षी योजनेला देशातील अनेक राज्यांनी लागू केले आहे. यातून प्रोत्साहन घेऊन अलीकडेच राज्यात हरित क्षेत्र वाढविण्यासाठी व्यापक वृक्षलागवड आणि वनसंवर्धनाच्या नव्या संकल्पनांनाही प्रोत्साहन दिले जात आहे.राज्याच्या हरित आच्छादनात वाढ करण्यासाठी दीर्घकालीन उद्दिष्टांसह विविध उपक्रम राबविले जात आहेत.

हरित पट्टा वाढविण्यासाठी शासनाबरोबरच विविध सामाजिक संस्था,शैक्षणिक संस्था आणि नागरिकही पुढे येत आहेत. शहरी भागांमध्ये उद्याने, जैवविविधता उद्याने, रस्त्यालगत वृक्षलागवड, नदीकाठ संवर्धन आणि स्थानिक वृक्ष प्रजातींचे संरक्षण यावर भर दिला जात आहे. ग्रामीण भागात सामाजिक वनीकरण, गाव तळी,तलाव खोलीकरण, नाला रुंदीकरण, परिसरातील हरितीकरण आणि सामुदायिक वृक्षलागवड कार्यक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. या उपक्रमांमुळे पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होत आहे.

पर्यावरण संरक्षणाची खरी ताकद मात्र सामान्य नागरिकांमध्ये आहे. प्रत्येकाने आपल्या परिसरात लहान-लहान पर्यावरणीय व्यवस्था (इकोसिस्टम) विकसित करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. घराच्या अंगणात, गच्चीवर, शाळा-महाविद्यालय परिसरात किंवा सार्वजनिक जागांमध्ये स्थानिक वृक्ष, फुलझाडे, औषधी वनस्पती लावून जैवविविधतेला प्रोत्साहन देता येते. पावसाचे पाणी साठविणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, पाण्याची बचत करणे आणि स्थानिक जलस्त्रोतांचे संरक्षण करणे ही देखील पर्यावरण संवर्धनाची प्रभावी साधने आहेत. 'जल, जमीन आणि जंगल ' ही आपल्या जीवनव्यवस्थेची तीन मूलभूत आधारस्तंभ आहेत. त्यांचे संरक्षण करणे ही आजच्या पिढीची नैतिक जबाबदारी आहे. आपण ज्या नैसर्गिक संपत्तीचा लाभ घेत आहोत, ती पुढील पिढीपर्यंत सुरक्षितपणे पोहोचविणे हेच खरे शाश्वत विकासाचे तत्त्व आहे.मान्सूनच्या आगमनानंतर राज्यभर पेरणीच्या कामांना वेग येतो.

**प्रवीण टाके**
उपसंचालक
विभागीय कार्यालय,
कोल्हापूर मो. ९७०२८५८७७७

**भारत का राजपत्र**
**The Gazette of India**
सी.जी. डी.एस.-अ.-21042026-271939
CG-DL-E-21042026-271939
ससाधारण EXTRAORDINARY
भाम ११ अण्ड उप-खण्ड (११)
PART 11 Section 3-Sub-section (ii)
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
सं 1890) नई दिल्ली, सोमवार, अप्रैल २०, २०२६/चैत्र ३०, १९४८
No. 1890) NEW DELHI, MONDAY, APRIL 20, 2026/CHAITRA 30, 1948

## सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय
## अधिसूचना
## नई दिल्ली, २० अप्रैल, २०२६

का.बा. १९६१ (अ).- केन्द्रीय नरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनिगम १९५६ (१९५६ का ४८) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा ३क की उप-धारा (१) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पच्चात् कि महाराष्ट्र राज्य के अकोला जिले में राष्ट्रीय राजमार्ग संख्या १६१ए के कि.मी. ०/०० से कि.मी. ३/१०० (महान-अकोला भाग) तक के भूखंड का निर्माण (बार्शीटाकळी वायपास दो / चार लेन पेव्ड शोल्डर सहित का बताने, नादि), अनुरक्षण, प्रबन्धन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए यह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिप्त वर्णन नीचे अनुसूची में दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा करती है।

कोई भी व्यक्ति, जो भूमि में हितबद्ध है, उक्त अधिनियम की धारा ३ग की उपधारा (१) के अधीन पूर्वीस प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख से इक्कीस दिन के भीतर अपनी आपत्ति प्रकट कर सकेगा।

ऐसी प्रत्येक आक्षेप सक्षम प्राधिकारी, तया उपविभागीय अधिकारी मुर्तीजापुर, को लिखित रूप ने किया जागसा और उसमें उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी, आपत्तिकर्ता को व्यक्तिगत रूप में या किसी विधि व्यवसायी द्वारा सुने जाने का अवत्तर देगा और ऐसी आजेगो की सुनवाई के पचात् तथा ऐसी और जांच करने के पश्ज्ञान, पदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे आदेश द्वारा या तो को अनुज्ञात कर सकेगा या अनुज्ञात कर सकेगा।

उक्त अधिनियम की धारा ३ग की उपधारा (२) के अधीन सजम प्राधिकारी द्वारा किया गया कोई भी आदेत अंतिम होगा।

इस अधिसूचना के अंतर्गत आने बाली भूमि के रेखांक और अन्य स्थर मम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्ध हैं और उनका तिच्य पतियों द्वारा निरीक्षण किया जा सकता है।

**अनुसूची**

महाराष्ट्र राज्य के अकोला जिले में राष्ट्रीय राजमार्ग संख्या १६१ए. के. कि.मी. ०/००से कि.मी. ३/१०० (महान-अकोला भाग) लिए बर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना महित भूमि का संक्षिप्त विवरण.

| राज्य का नाम : महाराष्ट्र | | | जिले का नाम : अकोला | | |
|---|---|---|---|---|---|
| क्रमिक संख्या | सर्वेक्षण संख्या | भूमि का प्रकार | भूमि की प्रकृति | भूमि का क्षेत्रफल (स्थानीय इकाई) | भूमि का क्षेत्रपाल (हेक्टेयर) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| तालुक का नाम : बार्शीटाकळी | | | | | |
| गांव का नाम : अश्कारीपूर | | | | | |
| १ | ३७ Paiki | सरकारी | अकृषक | ०.०११५ (हेक्टेयर) | ०.०११५ |
| गांव का नाम : बार्शीटाकळी | | | | | |
| २ | 45/1/E | निजी | अकृषक | ०.०४ (हेक्टेयर) | ०.०४ |
| | | | | **Total** | **0.0515** |

[F. No. RO/MUM/NH(O)/2023-24/72/3A)

**रोख अमीनखान, निदेशक**

**MINISTRY OF ROAD TRANSPORT AND HIGHWAYS**
**NOTIFICATION**
**New Delhi, the 20th April, 2026**

S.O. 1961/E)- in exercise of powers confirred by sub-section (1) of section 3A of the National Highways Act, 1956 (48 of 1956) (hereinafter referred to as the said Act), the Central Government, after being satisfied that for the public purpose, the land, the brief description of whith is given in the Schedule below is required for Building (Barshitaki Bypass Twu/ Four Lane with paved shoulder) maintenance, managemom and operation of National Highway No. 1614 in the stretch of land from Km 0/00 tu Km 3100 (Mahan-Akola Section) in the District of Akola in the State of Maharashtra, hereby declares itt intention to acquire such land Any person interested in the said land may, within twenty-one days from the date of publication of this notification in the Official Gazette, raise objections to the use of such land for the aforesaid purpose under sub-section(1) of section 3C of the said Act.

Every such objection shall be made to the Competent Authority, namely, Sub Divisional Officer Murtizapur, in writing and shall set out the grounds thereof and the Competent Authority shall give the objector an opportunity of being heard, either in person or by a legal practitioner, and may, after hearing all such objections and after making such further enquiry, if any, as the Competent Authority thinks necessary, by order, either Allow or disallow the objections.

Any order made by the Competent Authority under sub-section (2) of section 3C of the said Act shall be final.

The land plans and other details of the land to be covered under their notification are available and can be inspected by the interested person at the aforesaid office of the Competent Authority.

**SCHEDULE**

Brief description of the land to be acquired, with or without structure falling National Highway No. 161A within the stretch of the land from Km 0/00 to Km 3/100 (Mahan-Akola Section) in the District of Akola in the State of Maharashtra.

State: MAHARASHTRA District: AKOLA

| SL No. | Survey/Plot Number | Type of Land | Nature of Land | Area (in Local Unit) | Area (in Hectares) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| **Taluk: Barshitildi** | | | | | |
| **Village: Ashkaripur** | | | | | |
| 1 | 37 Paili | Government | Non Agriculture | 0.0115 (Hectare | 0.0115 |
| **Village : Barshitildi** | | | | | |
| 2 | 45/1/E | Private | Non Agriculture | 0.04 (Hecture) | 0.04 |
| | | | | **Total** | **0.0515** |

[F. No. RO/MUM/NH(O)/2023-24/72/3A)

**SHAIKH AMINKHAN,**
Directos

जा.क्र./जिमाका/अकोला/जाहिरात/३०/२०२६

सिटी न्यूज अकोला

शुक्रवार, दि. ५ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे अकोल्यात

प्रतिनिधी ५ जून

## 'फार्मासिस्ट नसलेली' मेडिकल दुकाने सिल कराच



**अकोला :** राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाची धुरा धडाकेबाज आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्याकडे येताच त्यांनी राज्यभरात बेकायदेशीर औषध विक्रेते आणि नियमबाह्य संस्थांवर धाडी टाकून दणका देण्यास सुरुवात केली आहे. मात्र, अकोला शहरातील औषध दुकानांची (मेडिकल) परिस्थिती अत्यंत चिंताजनक असून, 'अकोल्यातील औषध दुकानांमध्ये फार्मासिस्ट हजर नसतात' या गंभीर बाबीकडे स्थानिक अन्न व औषध प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे समोर येत आहे. केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या दबावाखाली स्थानिक प्रशासन कारवाईस टाळाटाळ करत असल्याचा थेट आरोप आता सुजाण नागरिकांमधून आणि सामाजिक संघटनांकडून केला जात आहे.

फार्मासिस्ट नसताना औषध विक्री करणाऱ्या शहरातील अशा सर्व बेजबाबदार मेडिकल संचालकांचे परवाने कायमचे रद्द करून त्यांच्यावर थेट फौजदारी गुन्हे का दाखल केले जात नाहीत ?. राज्याचे नवनवे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्वतः अकोल्यात गुप्त पथके पाठवून येथील मेडिकल दुकानांची झाडाझडती घ्यावी, तरच अकोल्यातील हे औषध माफियांचे आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांचे रॅकेट उद्ध्वस्त होईल, अशी तीव्र मागणी नागरिक करत आहेत.

### असोसिएशनचा आर्थिक दबाव आणि प्रशासनाची मूकसंमती ?

अकोल्यात औषध दुकानांची तपासणी करून कारवाई करणे हे अन्न व औषध प्रशासनाच्या स्थानिक अधिकाऱ्यांचे काम आहे. मात्र, जेव्हा-केव्हा कारवाईचा प्रसंग येतो, तेव्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन प्रशासनावर प्रचंड दबाव आणते. सूत्रांच्या माहितीनुसार, हा केवळ संघटनात्मक दबाव नसून, 'आर्थिक देवाणघेवाणी'चा मोठा मलिदा स्थानिक अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवला जातो. या आर्थिक दबावामुळेच अकोला एफडीएचे अधिकारी शहरातील नियमबाह्य मेडिकल संचालकांवर कठोर कारवाई करण्याचे टाळतात, अशी उघड चर्चा आता वैद्यकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

### फार्मासिस्ट गायब; रुग्णांच्या जिवाशी खेळ !

नियमानुसार, कोणत्याही मेडिकल स्टोअरमधून औषध देताना तिथे नोंदणीकृत फार्मासिस्ट (औषध निर्माण शास्त्रज्ञ) हजर असणे बंधनकारक आहे. मात्र, अकोला शहरातील बहुतांश मेडिकलमध्ये फार्मासिस्ट केवळ कागदावरच असून, दुकानात मात्र अप्रशिक्षित मुले किंवा स्वतः मालक औषध विक्री करत असल्याची खात्रीलायक माहिती आहे. डॉक्टरांच्या चिठ्ठीतील अक्षरे न समजल्यास चुकीचे औषध दिले जाण्याचा आणि रुग्णाच्या जिवाला धोका निर्माण होण्याचा मोठा प्रकार अकोल्यात घडत आहे.

# अकोला-दर्यापूर मार्गावर भीषण अपघातात पती-पत्नीचा जागीच मृत्यू

प्रतिनिधी ५ जून



**अकोला :** आज पहाटेच्या सुमारास दर्यापूर मार्गावर भीषण अपघात झाला. अपघातात पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाला. संतप्त गावकऱ्यांनी 'रास्ता रोको' करून स्पीड ब्रेकर लावण्याची मागणी केली. अकोला-दर्यापूर मार्गावरून एक अत्यंत धक्कादायक बातमी समोर येत आहे.

खराप गावाजवळ आज पहाटे ५ वाजेच्या सुमारास एका भरधाव चारचाकी वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की, दुचाकीवरील पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाला आहे. तर दूचाकी पुर्णपणे नष्ट झाली. अकोला दर्यापूर मार्गावर वाहनांचा वेग आता जीवघेणा ठरत आहे.सकाळी खरप जवळ झालेल्या अपघातात पती पत्नीचा नाहक बळी गेला. या घटनेनंतर परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून, संतप्त गावकऱ्यांनी स्पीड ब्रेकरसाठी आंदोलन केले. विजय पांडुरंग इंगळे आणि प्रतिभा विजय इंगळे असे मृत पती-पत्नीचे नाव असून ते खरप बुद्रुक गावचे रहिवासी होते. दोघेही मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह चालवायचे. पहाटेच्या सुमारास ते दुचाकीने जात असताना, एका अज्ञात भरधाव चारचाकीने त्यांच्या दुचाकीला पाठीमागून उडवले. धडक इतकी जोरदार होती की, दोघेही ५ ते १० फूट दूर फेकले गेले आणि त्यांचा जागीच प्राण गेला. अपघाताच्या तीव्रतेमुळे चारचाकी गाडीचे पुढचे चाक तुटून तब्बल ३० फूट दूर जाऊन पडले.अपघाताची माहिती मिळताच खराप गावातील शेकडो नागरिक घटनास्थळी जमा झाले. स्पीड ब्रेकर टाका आणि आरोपी चालकाला तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी गावकऱ्यांनी रस्त्यावर ठिय्या मांडला. घटनेची गांभीर्य ओळखून पोलीस प्रशासनाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी नातेवाईकांची आणि गावकऱ्यांची समजूत काढत आरोपीला लवकरच अटक करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले. या अपघातानंतर संतप्त गावकऱ्यांनी प्रशासनाकडे एकच मागणी लावून धरली आहे. या अपघातप्रवण क्षेत्रावर तात्काळ स्पीड ब्रेकर बसवण्यात यावेत जेणेकरून भविष्यात अशा निष्पाप लोकांचे बळी जाणार नाहीत.

# इलेक्ट्रिक शॉकने तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

**अकोट :** अकोट तालुक्यातील बोर्डी येथे विजेचा धक्का लागून १८ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना गुरुवारी (ता. ४) घडली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून गावकऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राकेश शेषराव वाकोडे (वय १८, रा. बोर्डी) यांना अचानक विजेचा जोरदार धक्का बसला. या अपघातात ते गंभीर जखमी झाले. घटनेनंतर कुटुंबीय व ग्रामस्थांनी त्यांना तातडीने वैद्यकीय उपचारासाठी हलविण्याचा प्रयत्न केला. मात्र उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. राकेश हा कुटुंबातील आशेचा किरण मानला जात होता.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ६ हजार सेंद्रिय खत पाकिटांच्या वितरणाला सुरुवात



**अकोला :** अकोल्यासमोर आज सर्वात मोठे आव्हान आहे ते म्हणजे वाढते तापमान, घटते भूजलस्तर आणि कमी होत चाललेले हरित क्षेत्र. यावर्षीही अकोल्याने तीव्र उन्हाळ्याचा सामना केला. एप्रिल आणि मे महिन्यात तापमानाने चाळीशी ओलांडली, तर अनेक भागांमध्ये पाणीटंचाईची झळ नागरिकांना सहन करावी लागली. अशा परिस्थितीत पर्यावरण संवर्धन ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून काळाची गरज बनली आहे.

याच पार्श्वभूमीवर १५ वर्षांपासून अकोल्यात राबविण्यात येत असलेला 'निर्माल्याचे खतात रूपांतर' हा उपक्रम. पर्यावरण रक्षणाचा एक प्रभावी आणि लोकाभिमुख म्हणून पुढे आला आहे. देवाला अर्पण केलेली फुले, हार आणि पूजासाहित्य जलाशयांमध्ये टाकून प्रदूषण वाढविण्याऐवजी त्यापासून सेंद्रिय खत तयार करून पुन्हा निसर्गाच्या सेवेत अर्पण करण्याचा हा अनोखा प्रयोग आहे.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त या उपक्रमांतर्गत तयार करण्यात आलेल्या सुमारे ६ हजार सेंद्रिय खत पाकिटांच्या वितरणाला प्रारंभ करण्यात आला. यासोबतच डेंग्यू प्रतिबंधासाठी पाईप जाळी वितरण आणि पर्यावरण जनजागृती कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले.

या उपक्रमासाठी नगरसेवक निलेश देव, शैलेश देव, जयंतराव सरदेशपांडे, दिलीप देशपांडे, राजेंद्र गुन्नलवार, भास्करराव बैतवार, निलेश दूधलम, विजय वाघ, प्रकाश जोशी,अजय शास्ती, राम उमरेकर, गणेश मैराळ, शाम नेने, नरेंद्र परदेशी, अनिल कुकुलवार आणि सौ. रश्मी देव गेली अनेक वर्षे सातत्याने कार्यरत आहेत.

# गंभीर रूग्णांना देखील तातडीने मदत नाही; शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वास्तव



**अकोला :** काल शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे ब्रेन स्ट्रोक आल्यामुळे एक आदिवासी महिला तिच्या पतीला रुग्णालयात घेऊन आली होती. गार्ड उपस्थित असतानाही कोणीही व्हिल चेअर किंवा स्ट्रेचर न दिल्यामुळे त्यांचे हाल झाले. पाठीवर नवऱ्याला घेऊन महिला भटकत होती. परंतु सुरक्षा गार्ड किंवा वार्डातील अटेंडंट कोणीही मदतीला धावले नाही. गंभीर रुग्णांसाठी संवेदना संपली काय असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.

पतीला तातडीने उपचार मिळावा म्हणून हवालदिल झालेल्या महिलेला मदत करण्याकरिता कोणीही पुढे यायला तयार नव्हते. त्यामुळे येथे उपचार की मरण असे प्रश्न उपस्थित होत आहेत. महिलेच्या एका हातात बॅग, बाजूला लहान मूल आणि पतीला वाचवण्यासाठी धडपड अशा पेचात ती सापडली होती. गंभीर रूग्णांना तरी तातडीने उपचार उपलब्ध करून द्यावे. कथित समाजसेवकां मधील माणूस अशा वेळी तरी जागा व्हावा यासाठी ती महिला आशाळभूत नजरेने पाहत होती. शेवटी तिलाच पतीला पाठीवर घेऊन वार्डात न्यावे लागले. अशा घटना मधून तरी रूग्णालय प्रशासन बोध घेईल का अशी विचारणा होत आहे.

# तीर्थंकर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या रुग्णसेवेची यशस्वी २० वर्षे

## २००६ साली लावलेल्या रोपट्याचा विस्तार

प्रतिनिधी ५ जून




**अकोला :** ख्यातनाम युरोलॉजिस्ट डॉ. प्रशांत मुळावकर आणि प्लास्टिक सर्जन डॉ. उत्पला मुळावकर यांनी ४ जून २००६ रोजी अकोल्यातील गड्डम प्लॉट मध्ये तीर्थंकर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे रोपटे लावले. आपणा सर्वांचे आशीर्वाद आणि शुभेच्छा मुळे २० वर्षे रूग्ण सेवा करू शकलो अशी कृतार्थ भावना रूग्णालयाच्या वर्धापनदिन निमित्ताने डॉ. प्रशांत मुळावकर आणि डॉ. उत्पला मुळावकर यांनी व्यक्त केली.

१९९८ साली मुंबईहून जे. जे. हॉस्पिटल मधून प्रशिक्षण घेऊन अकोला येथे युरोलॉजी आणि प्लास्टिक सर्जरी सेवा समर्पित केल्या. या भागात सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची गरज लक्षात घेऊन ती सेवा देऊ शकलो याचे समाधान आहे. त्या बद्दल आम्ही ऋणी आहोत. यापुढे देखील आम्हाला सेवा करण्याची संधी मिळो अशी अपेक्षा करतो. आपणा सर्वांच्या सहकार्यामुळे दोन दशकांची रूग्ण सेवा आम्ही करू शकलो. यासाठी तीर्थंकर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या वर्धापनदिन निमित्ताने डॉ. प्रशांत मुळावकर यांनी सर्वांचे आभार मानले.

# नवोदय प्रवेश पात्रता परीक्षेत भोपळे विद्यालयातील विद्यार्थ्याची निवड



प्रतिनिधी ५ जून

**हिवरखेड :** केंद्र शासनाच्या शिक्षण विभागाचे जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश पात्रता परीक्षेत हिवरखेड येथील सहदेवराव भोपळे विद्यालयाचा विद्यार्थी सोहम विनोद पोके याने यश संपादन करत प्रवेशासाठी पात्रता मिळविली आहे.

या यशाबद्दल अध्यक्ष अनिलकुमार भोपळे, उपाध्यक्ष डॉ. प्रमोद भोपळे व सुनील राऊत, कार्यवाह श्यामशील भोपळे, यांनी पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्यात. तसेच सोहमच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे सहकार्यवाह स्नेहल भोपळे व मुख्याध्यापक संतोषकुमार राऊत यांनी सोहमचे पालकांसह अभिनंदन केले. या यशाचे श्रेय सोहम आपले पालक, पर्यवेक्षक गणेश खानझोडे, वर्गशिक्षक प्रवीण सोनुने व मार्गदर्शक शिक्षक शशिकांत दही, आदी शिक्षक शिक्षिका यांना देतो. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# शिष्यवृत्ती परीक्षेत सहदेवराव भोपळे विद्यालयाचे घवघवीत यश



प्रतिनिधी ५ जून

**हिवरखेड :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक (इयत्ता ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षेत सहदेवराव भोपळे विद्यालय, हिवरखेड येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी) मध्ये अथर्व विष्णू राहाटे, प्रणित सुनील भगत, श्रद्धा गणेश ओंकारे, सोहम विनोद पोके, वेदांत विजय दामधर आणि युवराज चंद्रशेखर अग्रवाल हे विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले. तसेच पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी) मध्ये पूर्वेश अनिल हागे याने यश संपादन केले. यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अनिलकुमार भोपळे, उपाध्यक्ष डॉ. प्रमोद भोपळे व सुनील राऊत, कार्यवाह श्यामशील भोपळे तसेच सहकार्यवाह व विभाग प्रमुख स्नेहल भोपळे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच यावेळी प्राचार्य संतोषकुमार राऊत, पर्यवेक्षक गणेश खानझोडे, वर्गशिक्षक प्रवीण सोनुने व रंजीत राठोड, मार्गदर्शक शिक्षक शशिकांत दही, श्रीकांत परनाटे, संवाद अभ्यासिकेचे संचालक ज्ञानेश्वर अवचार व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे कौतुक केले.

परिसरातील विद्यार्थी विविध पात्रता परिक्षांमध्ये यश संपादन करीत आहेत. त्यांना मिळत असलेले योग्य मार्गदर्शनाचा फायदा त्यांना होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# श्री श्याम महाकाल महोत्सव उत्साहात साजरा

**अकोला :** श्यामप्रेमी सावरे अकोल्याच्यावतीने २७ मे रोजी श्री श्याम महाकाल महोत्सव सिटी स्पोर्टस क्लब येथे ऐतिहासिक स्वरूपात साजरा करण्यात आला. या महोत्सवात श्यामप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.

श्यामप्रेमी सावरे के अध्यक्ष मोंटू अग्रवाल यांनी सांगितले की, हा महोत्सव यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रत्येकांनी आपले कार्य जबाबदारी, निष्ठा व समर्पण भावनेने पार पाडल्यामुळेच हा महोत्सव ऐतिहासिक असा ठरला. कोलकाता येथून आलेले शुभ रूपम व उज्जैनचे प्रसिद्ध भजन गायक किशन भगत यांनी कार्यक्रमाला अविस्मरणीय बनविले. त्यांची भजने ऐकताना श्यामप्रेमी मंत्रमुग्ध झाले होते. या महोत्सवाच्या यशस्वीतेचे सर्व श्रेय श्यामप्रेमी यांना जात असून त्यांनी तन मन धनाने सहकार्य केल्यामुळे एवढा मोठा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# व्यसन हे प्रगतीतील अडसर, विवेकविरोधी : बबनराव कानकिरड



**अकोला :** 'व्यसनांचे दुष्परिणाम सर्वांना माहित असूनही लोक व्यसनाच्या आहारी जातात. वेळ, श्रम आणि पैशाची प्रचंड नासाडी व्यसनात होते. व्यसन हे व्यक्तीच्या व समाजाच्या प्रगतीतील मोठा अडसर असून ते विवेकविरोधी आहे,' असे परखड प्रतिपादन महाराष्ट्र नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक व सर्वोदय मंडळाचे जिल्हाध्यक्ष बबनराव कानकिरड यांनी केले.

श्री गुरुदेव सेवा मंडळ, मलकापूर चे वतीने बालाजी कॉन्व्हेंट येथे आयोजित 'श्री गुरुदेव बालिका सुसंस्कार शिबिरा'त ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. याप्रसंगी ज्येष्ठ नागरिक श्रीकृष्ण विखे पाटील व रामराव पाटेखेडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शिबिराचे संयोजक रामराव पाटेखेडे म्हणाले, 'या शिबिरात बालिकांना केवळ योग-प्राणायाम, लाठी-काठी, वाचन-लेखन, गायन-वादन व भजन एवढेच नाही, तर निसर्ग संवर्धन व व्यसनमुक्तीचे धडेही आवर्जून दिले जात आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांवर आधारित सुसंस्कार रुजवणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश आहे.' कार्यक्रमाचे सूत्र संचालन स्वाती पारेखेडे यांनी केले. आभार ज्योती काळणे यांनी केले.

# श्री क्षेत्र श्रद्धासागरला पुरूषोत्तम लाजुरकर यांच्या रुपात लाभले बहुआयामी व्यक्तिमत्व

## ह. भ. प. वासुदेवराव महाराज महल्ले यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी ५ जून




**अकोट :** श्री क्षेत्र श्रद्धा सागर द्वारा विविध सेवाभावी उपक्रम वर्षभर राबविल्या जातात. यामध्ये भक्त आणि संस्थेच्या विश्वस्त मंडळाचे योगदान फार महत्त्वाचे आहे. या सेवाभावी उपक्रमांमध्ये आगळीवेगळी भूमिका बजावणारे संस्थेचे कोषाध्यक्ष पुरुषोत्तम लाजुरकर हे श्री क्षेत्र श्रद्धासागरला लाभलेले बहुआयामी व्यक्तिमत्व आहे, असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. वासुदेव महाराज महल्ले यांनी केले. पुरुषोत्तम लाजुरकर यांचा पासष्टी अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यामध्ये अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महल्ले महाराज म्हणाले की, शासकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा क्षेत्रामध्ये आपल्या व्यक्तीत्वाचा आगळावेगळा ठसा उमटवून सेवा करणारे लाजुरकर बहुआयामी व्यक्तित्व ठरतात. सद्गुरु श्री संत वासुदेव महाराज उपाख्य श्री ज्ञानेश्वरदास विरचित ग्रंथांच्या प्रत्येक प्रकाशनामध्ये त्यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. या त्यांच्या वाङ्मय सेवेमुळे आज अनेक भक्तांकडे श्रींचे ग्रंथ उपलब्ध झाले आहेत.

संत वासुदेव महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. तत्पूर्वी सकाळी ह.भ.प. ज्ञानेशप्रसाद महाराज पाटील यांचे ज्ञानेश्वरी प्रवचन संपन्न झाले. प्रवचनात ६५ अंकाचे व पुरुषोत्तम मासाचे अधिक मासाचे माहात्म्य त्यांनी विषद केले. प्रास्ताविक नंदकिशोर हिंगणकर यांनी तर शुभेच्छापर मनोगत रवींद्र वानखडे, डॉ. विनायक गोळे व सौ. स्मितातार्ई गोळे यांनी मनोगत व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना लाजूरकर यांनी अशीच श्रीगुरुसेवा सदैव घडो, ही मागणी सुद्धा त्यांनी श्री गुरुचरणी व्यक्त केली. याप्रसंगी श्री संस्थेद्वारा गौरव पत्र, भेटवस्तू देऊन पुरुषोत्तम लाजूरकर व सौ. ज्ञानेश्वरी लाजुरकर यांचा हृद्य सत्कार करण्यात आला. गौरवपत्राचे वाचन मोहन जायले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमेश मोहोकार यांनी तर आभार प्रदर्शन जयदीप सोनखासकर यांनी केले.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६

## माँ. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय

गायत्री नगर. अकोला

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता १ ली ते १० वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार



मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय

मो. ९९२११८६७१५, ९५११२५४९५९, ९४२१८९५७९०, ९९६०४३७३६६

# पैनगंगेचे विद्रूपीकरण: बोरी- चतारी रेतीघाटावर अवैध उत्खनन

प्रतिनिधी ५ जून

**उमरखेड :** पैनगंगा नदीपात्रातील हर्रास न झालेल्या बोरी-चातारी रेतीघाटावर मोठ्या प्रमाणात अवैध रेती उत्खनन होत असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद देवसरकर यांनी केला आहे. महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांच्या कथित संगनमतामुळे आणि स्थानिक पातळीवरील दुर्लक्षामुळे रेती तस्करांना मोकळे रान मिळाले असून, त्यामुळे शासनाच्या महसुलाला लाखो रुपयांचा फटका बसल्याचा दावा करण्यात आला आहे.

पैनगंगा नदीच्या पात्राची विदर्भ आणि मराठवाडा हद्दीनुसार विभागणी करण्यात आली आहे. या विभागणीनुसार बोरी व चातारी हे रेतीघाट उमरखेड तालुक्याच्या हद्दीत येतात. यंदा या दोन्ही घाटांचा लिलाव (हर्रास) झालेला नसतानाही तेथून मोठ्या प्रमाणावर रेती उपसा सुरू असल्याचा आरोप आहे.



तक्रारीनुसार, मराठवाड्यातील दिघी रेतीघाटाचा लिलाव घेण्यात आला असला तरी त्या ठिकाणी खडकाळ भूभाग असल्याने प्रत्यक्षात उमरखेड हद्दीतील बोरी-चातारी घाटातून रेतीचे उत्खनन करण्यात येत आहे. यामध्ये काही महसूल कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली रेती तस्करी सुरू असून, तक्रारींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

या अवैध उत्खननामुळे पैनगंगा नदीचे पात्र मोठ्या प्रमाणात विद्रूप झाले असून, अनेक ठिकाणी खोल खड्डे निर्माण झाले आहेत. पर्यावरणीय हानीबरोबरच शासनाच्या महसुली उत्पन्नालाही मोठा फटका बसत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

## ◆ शासनाला लाखोंचा फटका

**जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार**

सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद देवसरकर यांनी याबाबत यवतमाळ जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. तसेच उत्खननाचे व्हिडिओ पुरावेही सादर केल्याचा त्यांचा दावा आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी गौण खनिज विभागाच्या अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र हंगाम संपत आला तरी अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

**तक्रार करूनही दखल नाही**

ठपैनगंगा नदीपात्रात दिघी हद्दीतून नव्हे तर बोरी-चातारी हद्दीतून मोठ्या प्रमाणात रेती उत्खनन होत असल्याची माहिती तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांनी दिली होती. त्याआधारे मी २९ मे रोजी यवतमाळ जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. उत्खननाचे व्हिडिओही पाठविले. मात्र अद्याप कोणताही वरिष्ठ अधिकारी प्रत्यक्ष पाहणीसाठी आलेला नाही. नदीपात्रात मोठमोठे खड्डे पडले असून हजारो ब्रास रेतीची चोरी झाली आहे,ठ असा आरोप सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद देवसरकर यांनी केला.

# हातभट्टी दारूविरोधात धडक मोहीम; सहा दिवसांत २६.८१ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी ५ जून

**यवतमाळ :** जिल्ह्यातील अवैध हातभट्टी दारू निर्मिती, विक्री व साठवणुकीवर आळा घालण्यासाठी यवतमाळ पोलीस दलाने राबविलेल्या विशेष मोहिमेत मोठी कारवाई करण्यात आली आहे. अवघ्या सहा दिवसांच्या कालावधीत २६० आरोपींविरुद्ध २६० गुन्हे दाखल करण्यात आले असून २६ लाख ८१ हजार ९६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



जिल्ह्यात हातभट्टी दारूचे उत्पादन व विक्री कायमस्वरूपी बंद व्हावी तसेच त्यातून निर्माण होणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसावा, या उद्देशाने पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी आणि स्थानिक गुन्हे शाखेला विशेष मोहिम राबविण्याचे निर्देश दिले होते.

या निर्देशांनुसार जिल्हाभरात छापेमारी करण्यात आली. मोहिमेदरम्यान अवैध हातभट्टी दारूची निर्मिती, साठवणूक, वाहतूक आणि विक्री करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर हातभट्टी दारू आणि मोहफुलांचा सडवा जप्त करून तो जागेवरच नष्ट केला. भविष्यात जिल्ह्यात कुठेही अवैध हातभट्टी दारूचे उत्पादन किंवा विक्री होऊ नये, यासाठी ही मोहीम पुढेही सुरू ठेवण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. तसेच नागरिकांनी आपल्या परिसरात अशा प्रकारची अवैध दारू निर्मिती अथवा विक्री सुरू असल्याची माहिती जवळच्या पोलीस ठाण्यास द्यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

ही मोहीम पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात तसेच जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे राबविण्यात आली.

# आर्णीत हातभट्ट्यांवर छापा; १.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी ५ जून

**आर्णी :** लोणी गावातील अवैध गावठी दारू निर्मितीच्या अड्ड्यांवर आर्णी पोलिसांनी गुरुवारी सकाळी एकाच वेळी धाड टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत तब्बल १ लाख २५ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तीन जणांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलिसांना लोणी गावात गावठी हातभट्टीवर दारू तयार करून विक्री केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने विविध ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत मोठ्या प्रमाणात मोहाचा सडवा, गावठी दारू आणि दारू गाळण्याचे साहित्य आढळून आले. पहिल्या कारवाईत अशोक वसंता बळी (वय ४३) याच्या घरातील पत्र्याच्या खोलीत सुरू असलेल्या हातभट्टीवर छापा टाकण्यात आला. तेथून १ हजार ५०० लिटरहून अधिक सडवा, ३० लिटर गावठी दारू आणि दारू निर्मितीचे साहित्य असा ६१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दुसऱ्या कारवाईत मनोज अमरसिंग राठोड (वय ४१) याच्या घरासमोरील परिसरातून ६०० लिटर सडवा, २० लिटर गावठी दारू आणि साहित्य असा २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर तिसऱ्या कारवाईत प्रमोद भुजंगराव बरडकर (वय ४०) याच्या शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये ९५० लिटर सडवा, १५ लिटर गावठी दारू आणि साहित्य आढळून आले. याची किंमत ३८ हजार ७५० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.



ही कारवाई पोलीस निरीक्षक निलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक रवींद्र जाधव व त्यांच्या पथकाने केली.


रुजू होताच आक्रमक कारवाई आर्णी पोलीस ठाण्यात नुकतेच रुजू झालेले पोलीस उपनिरीक्षक रवींद्र जाधव यांनी अवैध धंद्यांविरोधात आक्रमक भूमिका घेतल्याचे या कारवाईतून दिसून आले. त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या मोठ्या कारवाईमुळे परिसरातील अवैध दारू व्यवसायिकांमध्ये खळबळ उडाली असून अशा कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# काम पूर्ण होण्यापूर्वीच सिमेंट रस्त्याला भेगा

## ◆ ग्रामस्थ संतप्त, आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी ५ जून

**आर्णी :** मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कोसदनी–साकुर–मुकिंदपूर या सुमारे सात किलोमीटर लांबीच्या सिमेंट रस्त्याच्या कामात निकृष्ट दर्जाचा वापर झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. विशेष म्हणजे काम पूर्ण होण्यापूर्वीच रस्त्यावर ठिकठिकाणी भेगा पडल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून संबंधित ठेकेदार व अभियंत्यांवर कारवाईची मागणी होत आहे.



कोसदनी, साकुर आणि मुकिंदपूर या गावांना नागपूर–तुळजापूर महामार्गाशी जोडणाऱ्या या महत्त्वाच्या रस्त्यासाठी राज्य शासनाने सुमारे १४ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या कामाच्या देखरेखीची जबाबदारी मुख्यमंत्री ग्राम सडक बांधकाम यंत्रणेच्या अभियंत्यांकडे आहे. मात्र, कामाच्या गुणवत्तेकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

साकुर ते मुकिंदपूर या तीन किलोमीटरच्या सिमेंट रस्त्याचे काम पूर्ण झाले असले तरी या मार्गावर अनेक ठिकाणी चार ते पाच इंच रुंद आणि पाच ते दहा मीटर लांबीच्या भेगा पडल्याचे दिसून येत आहे. सिमेंट काँक्रीटच्या कामानंतर आवश्यक प्रमाणात पाणी न मारल्यामुळे हा प्रकार घडल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

रस्त्यावर पडलेल्या भेगांमुळे भविष्यात मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. याबाबत कार्यकारी अभियंता व सहाय्यक अभियंत्यांकडे वारंवार तक्रारी करण्यात आल्याचा दावा ग्रामस्थांनी केला. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने नागरिकांमध्ये संताप वाढत आहे.सध्या साकुर ते कोसदनी या टप्प्याचे काम सुरू असून तेही निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. कामाची तत्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# साईनाथ नगरातील नाली बांधकामास प्रारंभ

## पालकमंत्री संजय राठोड यांच्या निधीतून

प्रतिनिधी ५ जून

**दिग्रस :** प्रभाग क्रमांक ८ मधील साईनाथ नगर परिसरात पालकमंत्री संजय राठोड यांच्या निधीतून मंजूर झालेल्या नाली बांधकामाच्या कामाला अखेर सुरुवात झाली आहे. पावसाळ्यापूर्वी साचणाऱ्या पाण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाय व्हावा, या उद्देशाने हे काम हाती घेण्यात आले आहे. साईनाथ नगरातील नागरिकांकडून अनेक दिवसांपासून नाली बांधकामाची मागणी करण्यात येत होती. पावसाळ्यात परिसरात पाणी साचत असल्याने नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत होता. या समस्येची दखल घेत नगरसेवक किशोर कोहचडे, शिवसेना उपशहर प्रमुख संदीप रत्नपारखी, बंडू चव्हाण आणि यश खामकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे नाली बांधकामाच्या कामाला गती मिळाली.



# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

प्रतिनिधी ५ जून

**उमरखेड :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नैसर्गिक पर्यावरण संवर्धन संस्था, उमरखेडच्या वतीने गुरुवारी वीरशैव लिंगायत मोक्षधाम येथे ‘अर्जुन’ वृक्षाचे वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यावेळी पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन करण्यात आले.




यंदाच्या जागतिक पर्यावरण दिनाची संयुक्त राष्ट्र संघाने ‘निसर्गाकडून प्रेरणा हवामानासाठी, आपल्या भविष्यासाठी’ ही संकल्पना निश्चित केली असून हवामान बदल आणि त्यावरील उपाययोजनांवर विशेष भर देण्यात आला आहे. त्याअंतर्गत ‘नाऊ फॉर क्लायमेट’ या मोहिमेद्वारे जगभरातील नागरिकांना पर्यावरण संवर्धनासाठी एकत्र येण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# समन्वयाच्या राजकारणाची छाप; यवतमाळ विधान परिषदेत दुष्यंत चतुर्वेदी बिनविरोध

प्रतिनिधी ५ जून

**यवतमाळ :** यवतमाळ स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत अपेक्षित राजकीय चुरस टळली असून महायुतीचे उमेदवार दुष्यंत चतुर्वेदी यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. या बिनविरोध निवडीमागे पालकमंत्री संजय राठोड यांनी साधलेला सर्वपक्षीय समन्वय आणि राजकीय संवाद महत्त्वाचा ठरल्याची चर्चा जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात सुरू आहे.



४४६ मतदार असलेल्या या मतदारसंघात सुरुवातीला निवडणूक अटीतटीची होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. महाविकास आघाडीकडून उमेदवारीची तयारी सुरू होती, तर महायुतीतही काही प्रमाणात अंतर्गत हालचाली सुरू असल्याचे चित्र होते. त्यामुळे निवडणूक रंगतदार होईल, असा अंदाज वर्तविला जात होता. मात्र पुढील काही दिवसांत घडलेल्या राजकीय घडामोडींनी चित्र पूर्णपणे बदलले.

जिल्ह्याच्या राजकारणात संवाद आणि सहमतीची परंपरा कायम राहावी, या भूमिकेतून पालकमंत्री संजय राठोड यांनी विविध पक्षांच्या नेत्यांशी चर्चा सुरू केली. महायुतीतील घटक पक्षांबरोबरच विरोधी पक्षांच्या प्रमुख नेत्यांशीही संपर्क साधून त्यांनी निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न केल्याचे बोलले जात आहे. राज्यातील वरिष्ठ नेतृत्वाचेही या प्रक्रियेला पाठबळ मिळाल्याची माहिती राजकीय सूत्रांनी दिली.

महाविकास आघाडीचे उमेदवार साहेबराव कांबळे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर बिनविरोध निवडीचा मार्ग अधिक स्पष्ट झाला. त्यानंतर भाजपचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनीही वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून आपला अर्ज मागे घेतला. अपक्ष उमेदवार सय्यद फारुख तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे साजिद बेग यांनीदेखील माघार घेतल्याने दुष्यंत चतुर्वेदी यांच्या बिनविरोध निवडीवर शिक्कामोर्तब झाले.

या संपूर्ण प्रक्रियेत महायुतीतील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी पडद्यामागे समन्वयाची भूमिका बजावली. विविध स्तरांवर संवाद साधून राजकीय सहमती निर्माण करण्यात आली. त्यामुळे संभाव्य निवडणूक लढत टळली आणि बिनविरोध निवडीचा मार्ग सुकर झाला.

ठनिवडणूक झाली असती तरी महायुतीचा विजय निश्चित होता. मात्र निवडणूक बिनविरोध व्हावी, ही आमची सुरुवातीपासूनची भूमिका होती. सर्व पक्षांनी दाखविलेल्या सकारात्मक भूमिकेमुळे हे शक्य झाले,ठ अशी प्रतिक्रिया पालकमंत्री संजय राठोड यांनी व्यक्त केली. त्यांनी मित्रपक्ष, विरोधक आणि अपक्ष उमेदवारांचेही आभार मानले.

प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दुष्यंत चतुर्वेदी यांच्या विजयाची अधिकृत घोषणा करण्यात येणार आहे. दरम्यान, या निवडणुकीत साधलेल्या सर्वपक्षीय सहमतीमुळे यवतमाळ जिल्ह्याच्या राजकारणात समन्वय आणि संवादाचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे. बिनविरोध निवडीच्या या प्रयोगामुळे ‘यवतमाळ पॅटर्न’ची चर्चा आता जिल्ह्याबाहेरही सुरू झाली आहे.

# अकोट नगरपरिषदेचा कौंतेय एज्युकेशनसोबत करार

## नप शाळांतील विद्यार्थ्यांना वैदिक गणित, रोबोटीक्सचे मोफत प्रशिक्षण

प्रतिनिधी ५ जून

**अकोट :** नगरपरिषद शाळांमधील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी आणि त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी अकोट नगरपरिषदेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. नगरपरिषदेने ‘कौंतेय एज्युकेशन’ संस्थेसोबत विविध कौशल्याधारित व आधुनिक अभ्यासक्रम राबविण्यासाठी सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. या उपक्रमाअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये नगरपरिषदेच्या शाळांतील विद्यार्थ्यांना वैदिक गणित, अबॅकस, रोबोटीक्स, कोडींग आणि इंग्लिश स्पिकिंगचे प्रशिक्षण पूर्णतः मोफत दिले जाणार आहे.




नगराध्यक्षा माया धुळे, उपनगराध्यक्ष प्रथमेश बोरोडे, मुख्याधिकारी शशिकांत बाबर (मशप्रसे) तसेच कौंतेय एज्युकेशनचे प्रतिनिधी रवींद्र पोटदुखे यांच्या उपस्थितीत ३ जून रोजी हा करार करण्यात आला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. रोबोटीक्स आणि कोडींगच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये तार्किक विचारशक्ती, सर्जनशीलता आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होणार आहे. तसेच वैदिक गणित व अबॅकसच्या प्रशिक्षणामुळे गणितातील गती वाढून विद्यार्थ्यांची एकाग्रता आणि बौद्धिक क्षमता वृद्धिंगत होईल. जागतिक स्पर्धेच्या युगात इंग्रजी संभाषण कौशल्याचे महत्त्व लक्षात घेऊन इंग्लिश स्पिकिंग कोर्सचाही समावेश करण्यात आला आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास आणि उच्च शिक्षण तसेच रोजगाराच्या संधींसाठी आवश्यक कौशल्ये विकसित होण्यास मदत होणार आहे.

विशेष म्हणजे, खासगी प्रशिक्षण संस्थांमध्ये मोठ्या शुल्कात उपलब्ध असणारे हे अभ्यासक्रम नगरपरिषद शाळांतील विद्यार्थ्यांना कोणतेही शुल्क न आकारता उपलब्ध करून दिले जाणार आहेत. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांनाही गुणवत्तापूर्ण व आधुनिक शिक्षणाची समान संधी मिळणार आहे. याबाबत मुख्याधिकारी शशिकांत बाबर म्हणाले, ’नगरपरिषद शाळांमधील विद्यार्थी खाजगी शाळांतील विद्यार्थ्यांपेक्षा कुठेही मागे राहू नयेत, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. कौंतेय एज्युकेशनच्या सहकार्याने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरेल.’

या करारामुळे अकोट नगरपरिषद शाळांमधील शिक्षण व्यवस्थेला आधुनिकतेची नवी दिशा मिळणार असून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा उपक्रम मैलाचा दगड ठरणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी बार्शिटाकळी यांचे कार्यालय बार्शिटाकळी**

दुरध्वनी क्रमांक: 07255-252043 Email: tah_barshitakli@rediffmail.com

**जाहिरनामा**

या जाहिरनाम्याव्दारे सर्वत्र हितसंबधीत नागरीकांना सुनील करण्यात येते की, अर्जदार श्री. संतोष देवराव मोटे, रा. देशमुखफेल अकोला ता. जि. अकोला यांनी मौजे जमकेश्वर येथील स.नं. २३ भो. वर्ग- १ क्षेत्र एकुण सामाईक क्षेत्र २.१० हे.आर असुन मालकीचे व नावे असलेले शेतीचे ७/१२ चे ईतर अधिकार सदरी असलेले कुळ पुजांजी कानुजी असे नाव असुन सदरची नावे कमी करुन देण्याकरिता प्रकरण प्राप्त झाले आहे. प्रकरणात अर्जदार यांनी हस्तलिखीत ७/१२ व हक्कनोंदणी, फेरफार, आदेशप्रत ईत्यादी अभिलेख सहपत्रीत केले आहे.

तरी मौजे जमकेश्वर येथील पुंजाजी कानुजी अशी नोंद गट नं. २३ चे इतर अधिकार सदरामधुन कमी करण्याबाबत कोणाचे काही आक्षेप किंवा हरकती असल्यास त्यांनी आपले लेखी आक्षेप हरकती हा जाहिरनामा प्रसिध्दीच्या दिनांकापासुन १५ दिवसाचे आत या कार्यालयास प्रकरणात प्रत्यक्षरित्या सादर करावा. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती किंवा आक्षेपाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

शिक्का

(रवींद्र कापसीकर)
तहसिलदार, बार्शिटाकळी

सिटी न्यूज अमरावती
शुक्रवार, दि. ५ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## जिल्ह्यातील सर्व ८४० ग्रामपंचायतींचा 'माझे गाव आरोग्यसंपन्न गाव'

**अमरावती:** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याची सुदृढ आरोग्याकडे यशस्वी वाटचाल सुरू झाली आहे. जिल्ह्यात सध्या 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' हे अभियान प्रभावीपणे राबविले जात असून, जिल्ह्यातील एकूण ८४० ग्रामपंचायतींपैकी सर्व ग्रामपंचायतींनी या अभियानात शंभर टक्के सहभाग नोंदविला आहे. संपूर्ण जिल्हा आता स्वच्छता आणि आरोग्याकडे विशेष लक्ष देत असून, ग्रामीण भागात या निमित्ताने एक नवीन उत्साह निर्माण झाला आहे. या मोहिमेत सहभागी झालेल्या सर्व ग्रामपंचायती आणि स्थानिक आरोग्य संस्थांमध्ये आरोग्यविषयक विविध कार्यक्रम राबविले जात आहेत. अभियानांतर्गत केलेल्या उत्कृष्ट कार्यवाहीच्या जोरावर 'सुदृढ विजेता' म्हणून घोषित होण्यासाठी सर्व ग्रामपंचायतींमध्ये आता एक निरोगी स्पर्धा सुरू झाली आहे. गावागावात स्वच्छता आणि आरोग्य सुविधा बळकट करण्यावर विशेष भर दिला जात आहे.

# मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी पोलिसांनी डीएनए चाचणी केली

**◆ मृतदेह काजल इंगळे यांचा असल्याचे निष्पन्न ◆ या हत्येमागे प्रेमप्रकरण असल्याचा संशय ◆ माजी प्रियकरासह तिघांची चौकशी सुरू**

प्रतिनिधी ५ जून



**अमरावती :** गडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तापोवन टेकडी जंगलातील नाल्यात मंगळवारी सापडलेल्या अर्धवट जळालेल्या महिलेच्या मृतदेहाची अखेर ओळख पटली आहे.

मृत महिलेची ओळख काजल जितेंद्र इंगळे (वय २१, विश्रोळी, चांदूर बाजार तालुका) अशी पटली आहे. तिच्या कुटुंबीयांचा आरोप आहे की, तिच्या माजी प्रियकराने त्याच्या साथीदारांसह लोखंडी सळीने तिच्या तोंडात आणि पोटात वार करून तिची निर्घृण हत्या केली आणि नंतर तिचा मृतदेह जाळून टाकला. आई-वडिलांनी आपल्या मुलीला तिच्या कपड्यांवरून ओळखले. पोलिसांनी दोघांचेही डीएनए नमुने घेतले आहेत. या प्रकरणी पोलिसांनी तिचा माजी प्रियकर, साहिर्ता टानो याला चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

मंगळवारी, तापोवन टेकडी जंगलातील एका नाल्यात एका अज्ञात तरुणीचा अर्धवट जळालेला मृतदेह आढळून आला. मृतदेहाजवळून रक्ताने माखलेला एक लोखंडी सळई जप्त करण्यात आला. त्या तरुणीच्या तोंडात आणि पोटात लोखंडी सळईने वार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती आणि तिची ओळख लपवण्यासाठी मृतदेह जाळण्यात आला होता. मृतदेहाजवळून तो लोखंडी सळईदेखील जप्त करण्यात आला.

**कपड्यांवरून पालकांची ओळख पटली**

सोशल मीडियावर आणि बातम्यांमध्ये प्रसारित झालेले फोटो पाहिल्यानंतर, मृत तरुणीच्या आत्या आणि भावाने कपड्यांच्या तुकड्यांवरून तिची ओळख पटवली. त्यानंतर पोलिसांनी मृतदेह त्यांच्या ताब्यात दिला. कायदेशीर प्रक्रियेचा भाग म्हणून दोन्ही महिलांचे डीएनए नमुनेही घेण्यात आले, ज्यांची नंतर चाचणी करण्यात आली.

**मृतदेह ३६ तास पडून होता**

मंगळवारी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास, तापोवन जंगलात तरुणीचा मृतदेह सापडल्याची माहिती पोलिसांना मिळाली. सुमारे ३६ तासांपूर्वी त्या तरुणीची निर्घृण हत्या करण्यात आली होती.

आरोपींनी पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेहाला आग लावली, परंतु तो पूर्णपणे जळाला नाही. महिलेच्या मृतदेहावर पिवळ्या रंगाचा पोशाख दिसत होता. जमिनीवर आदळल्यामुळे मृत महिलेचा चेहरा खूप कुजला होता.

थोरात नावाच्या एका महिलेने असाही दावा केला आहे की, मृत महिला तिची नातेवाईक काजल होती.

**कुटुंबाचा नातेवाईकावर संशय**

मृत महिलेच्या कुटुंबीयांनी दर्यापूर भागातील एका दूरच्या नातेवाईक तरुणावर संशय व्यक्त केला आहे. तो तरुण आणि काजल पूर्वी प्रेमसंबंधात होते. नंतर काही कारणास्तव त्यांचे नाते तुटले. त्यामुळे तो बऱ्याच काळापासून काजलचा छळ करत होता. लग्न ठरल्यानंतर तो तिला धमक्या देत होता. महिलेचे लग्न होणार असल्याचे कळल्यानंतर त्याने खून केला असावा. पोलिसांनी तिच्या माजी प्रियकरासह तीन जणांना चौकशीसाठी तात्काळ ताब्यात घेतले. हे लिहीपर्यंत आरोपीची चौकशी सुरू होती.

त्याला तुरुंगात पाठवण्यात आले आहे. तपासात असे उघड झाले आहे की, काजल सुमारे चार महिन्यांपूर्वी शिक्षण आणि कामासाठी अमरावतीला आली होती. ती तपोवनमध्ये भाड्याच्या खोलीत राहत होती. तिने शहरातील एका खाजगी रुग्णालयात सुमारे तीन महिने कामही केले होते. २५ मे रोजी तिच्या लग्नाची बोलणी अंतिम टप्प्यात होती आणि त्यासाठी ती तिच्या गावी परत गेली होती.

नंतर सोमवारी, ती अमरावतीमधील तिच्या खोलीतून सामान घेण्यासाठी शहरात परत आली. सोमवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी सेंट्रल बस स्टँडच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये काजलला पाहिले. दुपारी, ती तपोवन भागातील बडे बाबांच्या घरी गेली. तिथून निघाल्यानंतर ती गायब झाली. दुसऱ्या दिवशी तिचा मृतदेह सापडला.

## जिल्ह्यातील मंदिर विश्वस्त आयुक्त व जिल्हाधिकारी यांचे दालनात

प्रतिनिधी ५ जून



**अमरावती :** यातील शेकडो मंदिरांचे विश्वस्त पदाधिकारी व भक्तगण स्वयंप्रेरणेने उपस्थित राहून देवस्थान संरक्षणासाठी एकजूट झाले.

निवेदनादवारे मंदिराच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले. त्यामध्ये पुढील प्रमुख मागण्या करण्यात आल्या. या निवेदन विषयी निलेश टवलारे माहिती देताना म्हणाले की, मंदिरांना दानरूपाने मिळणाऱ्या अथवा खरेदी केलेल्या शेतजमिनीचे मूल्यांकन कंपनी किंवा संस्थांप्रमाणे न करता शेली दराप्रमाणे करण्यात यावे. तसेच मंदिरांच्या दान व खरेदी दस्तांसाठी मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे.

मंदिर मालकीच्या शेतीला नैसर्गिक आपती, अवकाळी पाऊस, गारपीट, दुष्काळ अथवा इतर कारणांमुळे नुकसान झाल्यास सर्वसामान्य शेतकऱ्यांप्रमाणे नुकसानभरपाई व शासकीय मदत देण्यात यावी.

मंदिरांच्या शेतजमिनीना कुळ कायदा व कमाल जमीन धारणा (सिलिग) काय?द्यांतर्गत मिळालेली सूट कायम ठेवण्याल गावी व त्यासाठी आवश्यक असलेल्या विविध प्रकारच्या सूट प्रमाणपत्रांच्या अटी रद्द करण्यात याव्यात. या निवेदन मधील दुसर्या विषयी आशिष मारुडकर यांनी मंदिर व तीर्थक्षेत्र विकास निधी खर्च करताना संबंधित मंदिर संस्था, विश्वस्त मंडळे व स्थानिक व्यवस्थापन समितींना विश्वासात घेऊन निर्णय घेण्यात यावेत. मंदिर व तीर्थक्षेत्र विकासासाठी निश्चित करण्यात आलेली जागा संबंधित विकास यंत्रणेकडे हस्तांतरित करण्याची अट रद्द करण्यात यावी असे प्रशासन व सरकार यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद केले.

## मेळघाट व अचलपुरातील पाणीटंचाई वर बच्चू कडूंचे ठिय्या आंदोलन

प्रतिनिधी ५ जून



**अमरावती :** अचलपूर विधानसभा मतदारसंघासह मेळघाटातील नागरिकांना प्रशासकीय दिरंगाई आणि यंत्रणेच्या निष्काळजीपणामुळे पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहण्याची वेळ येत असल्याचा आरोप करत आमदार बच्चू कडू यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि जलजीवन मिशन प्रशासनाला कडक इशारा दिला होता. मेळघाट संघर्ष यात्रेदरम्यान त्यांनी पाणीप्रश्नावर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला होता.

याच आंदोलनाच्या दुसऱ्या टप्प्यात गुरुवारी अमरावती येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रादेशिक कार्यालयात बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी मेळघाटातील विविध पाणीपुरवठा योजनांबाबतचे प्रश्न, रखडलेले प्रकल्प तसेच निधीअभावी थांबलेली कामे यावर अधिकाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

जोपर्यंत सुरू असलेले प्रकल्प तात्काळ पूर्ण होत नाहीत आणि मेळघाटातील जनतेला नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध होत नाही, तसेच आवश्यक निधीची व्यवस्था केली जात नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, अशी भूमिका बच्चू कडू यांनी घेतली. त्यानंतर त्यांनी कार्यकर्ते व नागरिकांसह कार्यालयातच ठिय्या आंदोलन सुरू केले.

बच्चू कडू आंदोलनाला बसल्याची माहिती पसरताच प्रशासनात एकच खळबळ उडाली. विविध स्तरांवर हालचाली सुरू झाल्या आणि प्रश्न सोडविण्यासाठी तातडीने प्रयत्न करण्यात आले. दरम्यान, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सचिव रंगा नायक यांनी बच्चू कडू यांच्याशी संपर्क साधून सध्या अस्तित्वात असलेली पाणीपुरवठाची कामे ही उन्हाळ्यात तात्काळ पूर्ण झाली पाहिजे अन्यथा ती पावसाळ्यानंतर पूर्ण करावी लागेल यामध्ये वाढीव निधीची गरज पडणार आणि त्याला वेगळी मान्यता घेण्याची गरज पडणार ही प्रक्रिया अडचणीची होईल त म्हणून सदर कामे ही पावसाळ्याचे पूर्वी वेळेत पूर्ण झाली पाहिजे त्यासाठी मेळघाटातील पाणीपुरवठा योजनांसाठी आवश्यक निधी तात्काळ उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद आणि निधी उपलब्धतेचे आश्वासन मिळाल्यानंतर बच्चू कडू यांनी आपले आंदोलन मागे घेतले. मात्र, आश्वासनांची अंमलबजावणी झाली नाही तर पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

## बडनेरा उड्डाणपुलाच्या लोकार्पणासाठी मुख्यमंत्री येणार; राणा दाम्पत्याकडून निमंत्रण

प्रतिनिधी ५ जून



**अमरावती:** आमदार रवी राणा आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी बुधवारी मुंबईतील मुख्यमंत्री निवासस्थान 'वर्षा' येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेत बडनेरा जुनी वस्ती येथील नवनिर्मित रेल्वे उड्डाणपुलाच्या मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते लोकार्पणासाठी विशेष आग्रहाचे निमंत्रण दिले. राणा दाम्पत्याच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि प्रयत्नांमुळे साकार झालेला तब्बल ५४ कोटी रुपयांचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प बडनेरा परिसराच्या विकासाला नवी गती देणारा ठरणार आहे. सुमारे तासभर चाललेल्या बैठकीत अमरावती जिल्ह्याच्या विकासाशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

उड्डाणपूल आणि एफटीओ उद्घाटनाचा विषय चर्चेत भेटीदरम्यान राणा दाम्पत्याने मुख्यमंत्री फडणवीस यांना बडनेरा येथील बहुप्रतीक्षित रेल्वे उड्डाणपुलाचे लोकार्पण त्यांच्या शुभहस्ते करण्याची विनंती केली. तसेच अमरावती विमानतळाजवळ उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक फ्लाइंग ट्रेनिंग ऑर्गनायझेशन (एफटीओ) केंद्राचे उद्घाटन लवकरात लवकर करण्यात यावे, अशी मागणीही केली. या प्रकल्पामुळे अमरावतीला राष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळण्यासोबतच युवकांसाठी प्रशिक्षण व रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## शासकीय इमारती व मनपाच्या कमर्शियल इमारतींच्या थकित कराची वसुली करा

**◆ अन्यथा काँग्रेस पक्ष जनतेला कर भरण्यास नकार देण्याचे आवाहन करेल!**

प्रतिनिधी ५ जून

**अमरावती :** महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्ढा यांनी कर विभागाचा आढावा घेत मालमत्ता कर वसुलीसाठी कठोर, परिणामकारक आणि सक्तीच्या उपाययोजनांचे निर्देश दिल्याबद्दल काँग्रेस पक्ष त्यांचे स्वागत आणि धन्यवाद व्यक्त करतो.परंतु, ही वसुली फक्त सर्वसामान्य, मध्यमवर्गीय आणि गरीब नागरिकांवरच केली जाणार असेल, तर आम्ही त्यास तीव्र विरोध दर्शवितो.महानगरपालिकेने जाहीर केलेल्या ८०० ते १००० मोठ्या बकायेदारांच्या यादीतील मोठे व्यावसायिक,शासकीय इमारती आणि इतर मोठ्या मालमत्तांमधून प्रथम पूर्ण वसुली करण्यात यावी.मनपाच्या कमर्शियल मार्केट्सचे भाडे गेल्या ७ वर्षांपासून निश्चितच झालेले नाही.यातून कोट्यावधी रुपयांची थकबाकी व उत्पन्न अडकले आहे.याची तातडीने भाडे निश्चिती करून वसुली करण्यात यावी.महानगरपालिकेच्या अनेक प्रॉपर्टीजचे लीज ६ ते ७ वर्षांपूर्वी संपले तरी अद्याप कब्जा कायम आहे.यातून मनपाला कोट्यावधी रुपयांचे उत्पन्न मिळू शकते मात्र यावर अद्यापही मनपा अधिकाऱ्यांकडून कुठलीही कार्यवाही करण्यात आलेली नाही कार्यवाही करण्यास मनपा अधिकाऱ्यांच्या हाताला लकवा गेलेला आहे का ? प्रशासनाचे हात - पाय यावर कारवाई करण्यासाठी थर - थर का कापतात असा आम्हाला प्रश्न निर्माण झालेला आहे.या सर्व प्रकरणांमध्ये कठोर कारवाई करून वसुली करण्यात यावी.वरील सर्व मोठ्या बकायेदार,शासकीय इमारती आणि मनपाच्या स्वतःच्या संपत्तींची थकित वसुली पूर्ण झाल्याशिवाय सर्वसामान्य नागरिकांवर जप्ती, सीलिंग सारख्या सक्तीच्या कारवाया करण्यात येऊ नयेत. भेदभावपूर्ण धोरण राबवल्यास काँग्रेस पक्ष शहरातील सर्व सामान्य नागरिकांच्या वतीने मालमत्ता कर भरण्यास नकार देण्याचे खुल्या आवाहन करेल.अन्यथा, काँग्रेस पक्ष जनआंदोलन करण्यास मागेपुढे पाहणार नाही.न्याय्य आणि समान वसुलीला आमचा विरोध नाही, परंतु भेदभावपूर्ण आणि दडपशाही धोरणाला आमचा तीव्र विरोध आहे.आम्ही सामान्य नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू. असे बबलु शेखावत, विलास इंगोले म्हणाले.

## दर्यापूर बस स्थानक व आगार परिसरात BOT तत्त्वावर व्यापारी संकुल उभारण्याची मागणी

**◆ अतिक्रमणग्रस्त व्यावसायिकांना दिलासा देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे निवेदन**

प्रतिनिधी ५ जून



**दर्यापूर:** शहरात सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे अनेक लघु व्यावसायिक, हातगाडीधारक, फेरीवाले व स्वयंरोजगार करणारे नागरिक प्रभावित झाले असून त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष तथा माजी नगरसेवक अमोल अशोकसिंह गहरवार यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या दर्यापूर आगार व्यवस्थापकांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनामध्ये दर्यापूर बस स्थानक व आगार परिसरातील उपलब्ध जागेवर BOT (Build-Operate-Transfer) तत्त्वावर आधुनिक व्यापारी संकुल उभारण्याचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे प्रभावित झालेल्या नागरिकांना कायदेशीर व्यवसायाची संधी उपलब्ध होण्यास मदत होईल. तसेच एसटी महामंडळाच्या उत्पन्नात वाढ होऊन प्रवाशांना अधिक सुविधा उपलब्ध होतील, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष निलेश पाटील मापारी, शहराध्यक्ष अमोल गहरवार, शहर सरचिटणीस संतोष ढोकणे, तालुका युवक सरचिटणीस गजानन मानकर, गजानन पिंजरकर, सय्यद इरफान सय्यद युसूफ, सय्यद इमरान सय्यद इनुस, सय्यद रहमान सय्यद हसन, मेपालसिंह ठाकूर तसेच सय्यद शहजाद सय्यद रहमान आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जिजाऊ बँकेला दरवर्षी मिळणार नविन अध्यक्ष; बबन आवारे ,अनिल बंड , श्रीकांत टेकाडे यांना संधी

प्रतिनिधी ५ जून

**◆ एकसंघ बँक निर्मितीसाठी रिझर्व बँकेच्या दहा वर्ष मर्यादेनुसार अविनाश कोठाळे यांचा राजीनामा**



**अमरावती :** जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँक अमरावती, विदर्भातील अग्रगण्य अल्पावधीत प्रसिद्धिस आलेल्या उत्कृष्ट बँकेस पंचवीस वर्षे पूर्ण झाले असुन रिझर्व बँकेच्या मापदंडानुसार फायनान्शिअल साऊंड वेल मॅनेज बँकेचे आर्थिक वर्ष २०२५-२६ मार्च अखेर ठेवी ४९७ कोटी, कर्ज ३२६, गुंतवणूक २३२कोटी, सी आर ए आर १५.८३ टक्के, एकूण नफा ३.१४कोटी ,नेट एनपी १.८३ टक्के असून अमरावती जिल्ह्यात स्थापन झालेल्या बँकांमध्ये जिजाऊ बँक प्रथम क्रमांकावर आहे.

बँकेचे संस्थापक अध्यक्ष अविनाश कोठाळे हे २००० ते २०११ व २०१७ते २०२६ या वर्षामध्ये अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या२०वर्ष कार्यकाळात बँकेची चार मजली आकर्षक इमारत तथा बँकेला स्थैर्य प्राप्त झाले. बँकेच्या स्थापनेपासून सर्व विविध संचालकांचे परिश्रम,साथ,एकोपा व काम करण्याची धडाडी यामुळेच बँकेने प्रगती केल्याचे अविनाश कोठाळे म्हणाले. त्यांच्या समवेत प्रसिद्ध उद्योजक राजेंद्र जाधव बँकेच्या व्यवस्थापन समितीचे नवनिर्वाचित संचालक मंडळानुसार अध्यक्ष आहेत. जिजाऊ बँकेला आर्थिक वर्ष २०२५- २६ करिता एप्रिल २६मधे झालेल्या तिसऱ्या राष्ट्रीय अर्बन कॉपरेटिव्ह क्रेडिट सेक्टर समित २०२६ मध्ये ङफायनान्शिअल साऊंड अँड वेल मॅनेज बँक मापदंड पूर्ण करणारी बँक, तथा ँघ् नूसार लेव्हल१, संगणक मापदंड परीपूर्ण करणाऱ्या बँकेला मान्यवरांच्या हस्ते ङबेस्ट अर्बन कॉपरेटिव्ह बँक ऑफ द इयर,तथा बँकेचे अध्यक्ष अविनाश कोठाळे यांना बेस्ट चेअर पर्सन ऑफ द इयर हा पुरस्कार देऊन परिषदेमध्ये जिजाऊ बँकेचा गौरव करण्यात आला.

जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेची सार्वत्रिक निवडणूक डिसेंबर २०२३ मध्ये प्रथमच झाली असतांना जिजाऊ बँकेत जिजाऊ सहकार पॅनलचे १० संचालक निवडून आणण्यात जिजाऊ बँकेचा पारदर्शक कारभार, सभासदांना दरवर्षी १०ते१२ज्ञ् लाभांश देण्याची परंपरा , ठेवीदारांचे संरक्षण व महत्तम व्याज, आणि गरजू व्यक्तींना विविध कामांसाठी तात्काळ कर्ज देण्याची यशस्वी प्रक्रिया,आणि विश्वसनीयता असल्याने अविनाश कोठाळे व राजेंद्र जाधव यांच्या नेतृत्वात जिजाऊ बँकेने उत्तम लोकप्रियता मिळवली.

जिजाऊ बँकेच्या संचालकांमध्ये एक मत असल्यामुळे या प्रस्तावाला सकारात्मकतेने टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले होते. त्यानुसार बँकेचे अध्यक्ष अविनाश कोठाळे यांनी ३० एप्रील२०२६ला राजीनामा देण्याचा मानस २एप्रिल २६ च्या पहिल्या आठवड्यात जाहीर केला. तत्कालीन समयी अध्यक्ष आणि संचालक पदाचा एकाच वेळेस राजीनामा देऊ नये असे संचालकांच्या आग्रहानुसार ठरविण्यात आले.जिजाऊ बँकेच्या ठेवीदारांवर कोणता परिणाम होऊ नये याकरिता राजीनामा गोपनीय ठेवण्याचे निर्देशित करण्यात आले. तत्पूर्वी राजेंद्र जाधव यांनी जिजाऊ बँकेच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंट अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. तदनंतर बँकेमध्ये एक संघता निर्माण व्हावी, परस्पर विरोध संपवावा, थकीत कर्जदारांच्या तक्रारी संपवाव्यात या हेतूने सर्व संचालकांनी एकत्रितपणे प्रयत्न केले. अध्यक्ष कोठाळे यांचा३०एप्रिल ला कार्यान्वित होणारा नियोजीत राजीनामा दिल्यामुळे असंख्य ठेवीदारांनी अध्यक्ष कोठाळे यांना विनंती केल्याने मुदती पूर्वी राजीनामा परत घेण्यात आला. अध्यक्ष कोठाळे हे ३ एप्रिल ते १८ एप्रिल२०२६ पर्यंत वैयक्तिक रित्या पर्यटनासाठी युरोपला गेल्याने जिजाऊ सहकार पॅनलचे उपाध्यक्ष प्रदीप चौधरी यांच्याकडे कार्यभार अध्यक्षांनी सोपविला होता. यादरम्यान जिजाऊ बँकेचे अध्यक्ष पद रिक्त झाल्याचे दर्शवुन अध्यक्षपदाच्या निवडीसाठी सहकार खात्यातर्फे २२मे२०२६ला निवडणूक कार्यक्रम लावण्यात आला.सहकार खात्याची कृती घाईघाईची असल्याचे मत असंख्य जाणकारांनी व्यक्त केले.अविनाश कोठाळे व अरविंद गावंडे यांनी जिजाऊ बँकेच्या सर्व संचालकांनी अविरोधपणे अध्यक्ष पदाची निवडणुक होत असल्याने सदर बाब बँकेच्या निकोप वाढीसाठी ऊत्तम असल्याचे मत व्यक्त केले. प्रथम वर्षी बबन आवारे, दुसऱ्या वर्षी प्रा. अनिल बंड व तदनंतर ईजी.श्रीकांत टेकाडे हयांना अध्यक्षपद देण्याचे उपस्थित सर्वच संचालकांनी लेखी स्वाक्षांकनाने अविरोधपणे सर्वानुमताने ठरविले. सहकार क्षेत्रात आपसातील मतभेद कमी करणे, सहकार्य वाढविणे, समाजामध्ये एकोपा निर्माण करणे, सहकारी चळवळ वृद्धिंगत करणे यावर वयाच्या ६५नंतर अत्यंत प्रेमाने समाजोन्नतीसाठी काम करण्याचे ठरविण्यात आले. बबन आवारे यांचे प्रथम वर्षीच्याअविरोध अध्यक्षपदी निवडीनंतर इंजि अविनाश कोठाळे, इंजि. अरविंद गावंडे, उपाध्यक्ष ईजी. प्रदीप चौधरी व नवनिर्वाचित अध्यक्ष बबन आवारे ह्या सर्वांनी जिजाऊ बँकेत सहकार एक संघतेने वृद्धिंगत करणे, कोणतेही पर?स्पर मतभेद न ठेवता बँकेच्या प्रगतीसाठी आणि सर्व सभासदांचा सहकारातुन आर्थिक विकास करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे आपल्या भाषणातून सुतोवाच केले. तसेच बँकेचे संस्थापक अध्यक्ष अविनाश कोठाळे यांन विदर्भामध्ये दरडोई उत्पन्न वाढवण्यासाठी नागरिकांमध्ये आर्थिक साक्षरता अत्यंत गरजेची असल्याचे प्रतिपादन केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शुक्रवार दि ५ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

राजकीय ॲक्टर,
स्त्रीभ्रूणहत्येचा फॅक्टर,
अविवेकी डॉक्टर,
बोगस कॅरेक्टर...




# आरोपी ज्ञात, दाखविला अज्ञात... स्त्रीभृण हत्येचे महापाप, आरोपींना करू नका माप!




●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

*** तपास यंत्रणा बदला, कठोर कारवाई करा- जनतेची मागणी**
*** मालेगाव येथील बेकायदेशिर स्त्रीभृण हत्या प्रकरण**
*** पोलिस व आरोग्य विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह**

वाशीम जिल्ह्यातील मालेगाव नगरीत राजाश्रयाच्या भरवशावर सुरू असलेल्या गर्भपाताच्या आणि बेकायदेशीररित्या गर्भ लिंग निदान चाचण्या करून कोट्यवधीची कमाई करणाऱ्या अविवेकी डॉक्टरसह त्याच्या महापापात सहभागी असलेल्या अज्ञात महिला डॉक्टरला पोलिसांनी 'ज्ञात' करून गजाआड करावे. तसेच आरोग्य विभागाने अविवेकी डॉक्टरच्या सोनोग्राफीच्या गोरखधंद्याला कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी जागरूक जनतेकडून केल्या जात आहे. स्त्री भृण हत्येच्या महापापत सहभागी असलेल्यांना माप करू नये त्यांच्यावर कठोर कारवाई करावी तपास यंत्रणा बदलून स्थानिक गुन्हे शाखा किंवा एसआयटीकडे द्यावी अशी मागणी होत आहे.

गेल्या अनेक वर्षापासून राजाश्रयाच्या आड अविवेकी डॉक्टरचा सोनोग्राफीचा व्यवसाय गर्भ लिंग निदान चाचणी करून स्त्री भृण हत्या करण्यासाठी नावारूपास आला आहे.




अविवेकी डॉक्टरचे लागेबांधे वाशीम जिल्ह्यातील डॉक्टरांसह अनेक डॉक्टरच्या हाताखाली कंपाऊंडरचे काम करणाऱ्या आणि सद्या अविवेकी डॉक्टरच्या महापापात सहभागी होवून दलाली खाणाऱ्या बोगस डॉक्टरांसोबत असल्याची चर्चा आहे. मालेगाव नगरीच्या गजबजलेल्या बाजारपेठेच्या मध्यभागी अविवेकी डॉक्टरचा दवाखाना आहे. या दवाखान्याची ख्याती 'गुड न्यूज' आणि 'बॅड न्पूज' च्या अफलातून बेकायदेशीर व्यवसायामुळे वाशीम जिल्ह्यातच नव्हेतर परिसरातील विदर्भ, मराठवाड्यातील जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या शेजारी असलेल्या काही राज्यापर्यंत अविवेकी डॉक्टरच्या लाभार्थींची व्याप्ती असल्याची मालेगाव परिसरात चर्चा आहे. शासनाची गर्भ लिंग निदान चाचणी करण्यासाठी 'बंदी' आहे.अशा चाचण्या करणाऱ्या सोनोग्राफी सेंटर वर कारवाई करण्याचे आरोग्य यंत्रणेला अधिकारही आहेत.परंतु मालेगावात खुलेआम गर्भ लिंग निदान चाचण्या करून स्त्री भृण हत्या करणार्या या अविवेकी डॉक्टरच्या विरोधात कारवाई केल्या जात नव्हती. एखाद्या अधिकाऱ्याने कारवाईचा प्रयत्न केला तर त्या अधिकाऱ्यावर दबाबतंत्राचा, पैशाच्या आमिषाचा वापर करून या महापापाची शृंखला अविरत सुरू ठेवण्यासाठी अविवेकी डॉक्टरसह त्याला साथ देणारी सर्वांना माहिती असलेली महिला डॉक्टर, दलाल यांनी साथ देवून या महापापाच्या कमाईतून आर्थिक सुबत्ता प्राप्त केल्याची माहिती प्राप्त झाली आहे.गेल्या अनेक वर्षापासून राजाश्रयाच्या आड सुरू असलेल्या या गोरखधंद्यावर मालेगाव येथील आरोग्य विभागाच्या धाडसी वैद्यकीय अधीक्षकांनी अविवेकी डॉक्टरच्या सौनोग्राफी सेंटरवर बनावट महिला पेशंट पाठवून अविवेकी डॉक्टरच्या पापाचा भांडाफोड केला आहे.

या प्रकरणी आरोग्य विभागाच्या वतीने मालेगाव पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.परंतु या तक्रारीत पापात सक्रीय सहभागी असलेल्या महिला डॉक्टरला अज्ञात महिला डॉक्टर दाखवून हे प्रकरण रफादफा करण्यासाठी अविवेकी डॉक्टरची 'टीम' युद्धस्तरावर प्रयत्न करत असल्याची सत्ताधारी पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये चर्चा आहे. त्यामुळे तपास यंत्रणा बदलावी अशी मागणी जनतेतून होत आहे.

## थोडक्यात

### कागदपत्रांच्या जुळवाजुळवीत पालक हैराण !

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

दहावी आणि बारावी परीक्षेचे निकाल लागून काही दिवस झाले असून, शाळा व महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रियेला खऱ्या अर्थाने मोठा वेग आला आहे. अकरावी, आयटीआय, पॉलिटेक्निक तसेच पहिल्या प्रवेशासाठी विद्यार्थी व पालकांची आवश्यक कागदपत्रे गोळा करण्यासाठी एकच धावपळ उडाली आहे. त्यामुळे परिसरातील सेतू सुविधा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र, तहसील कार्यालय आणि झेरॉक्स सेंटरवर सकाळपासूनच नागरिकांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळत असून, पालकांची चांगलीच तारांबळ उडत आहे.

दहावी-बारावीचा निकाल लागल्यानंतर आता विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षणाचे वेध लागले आहेत. मात्र, ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने फॉर्म भरताना विविध प्रकारच्या शासकीय दाखल्यांची अट घालण्यात आल्यामुळे पालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. प्रवेशासाठी शाळा सोडल्याचा दाखला (टीसी), जन्मदाखला, जातीचा दाखला, नॉन-क्रिमीलेअर, उत्पन्न प्रमाणपत्र, आधार कार्ड, बँक पासबुक, रेशन कार्ड आणि रहिवासी दाखला अशा अनेक कागदपत्रांची पूर्तता करावी लागत आहे. यातील एकही कागद कमी पडला तर संपूर्ण प्रवेश प्रक्रिया खोळंबण्याची भीती असल्याने, पालक आपली सर्व कामे बाजूला ठेवून आधी कागदपत्रे गोळा करण्याला प्राधान्य देत आहेत.

### दर्जेदार दूरसंचार सेवा पोहोचविण्याच्या सुचना -जिल्हाधिकारी

**वाशीम :** दूरसंचार सुविधा ही काळाची गरज असून ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक नागरिकाला अखंडित मोबाईल नेटवर्क आणि इंटरनेट सेवा उपलब्ध होणे अत्यावश्यक आहे. यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधून दिलेल्या सूचनांची तातडीने अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले. जिल्ह्यातील दूरसंचार सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी जिल्हास्तरीय दूरसंचार समितीची (डिएलटीसी) बैठक ४ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते.जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी जयेश खंडारे, राहुल काकड यांच्यासह भारत संचार निगम लिमिटेडचे अकोला व वाशिम येथील अधिकारी, विविध दूरसंचार कंपन्यांचे संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## आरोग्य यंत्रणा 'कागदी घोडे' हे मोडीत काढले वाक्य...

# वाशीम जिल्हा रुग्णालयात 'अशक्य ते शक्य'!

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

### *गरिबांच्या आशेचा किरण बनली स्वरयंत्राची यशस्वी शस्त्रक्रिया

'सरकारी दवाखान्यात जाऊन काय होणार?' हा प्रश्न सामान्य माणसाच्या मनात नेहमीच घर करून असतो. मात्र, वाशीम जिल्हा सामान्य रुग्णालयातील डॉक्टरांच्या टीमने या प्रश्नाला आपल्या कर्तृत्वाने एक सकारात्मक उत्तर दिले आहे. केवळ उपचारच नव्हे, तर गरिबांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणारे 'देवदूत' म्हणून या रुग्णालयातील वैद्यकीय पथक समोर आले आहे.

नुकत्याच घडलेल्या एका घटनेत, ६० वर्षांच्या एका ज्येष्ठ रुग्णाच्या स्वरयंत्रावर (वोकॅल कॉर्ड) दुर्मिळ आणि अत्यंत गुंतागुंतीची गाठ काढण्याची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. वृद्धत्वामुळे आणि आजाराच्या गांभीर्यामुळे रुग्णाचे कुटुंब पूर्णपणे खचले होते. खाजगी रुग्णालयांचा महागडा खर्च त्यांच्या आवाक्याबाहेरचा होता. अशा निराशेच्या छायेखाली असताना, जिल्हा रुग्णालयाचे दार त्यांच्यासाठी 'आशेचा किरण' ठरले. ही शस्त्रक्रिया केवळ तंत्रज्ञानाची कसोटी नव्हती, तर ती डॉक्टरांच्या संयमाची आणि माणुसकीची परीक्षा होती. कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. संतोष बेदरकर, डॉ. योगेश जाजू आणि डॉ. सोनाली टिकाईत यांनी अत्यंत नाजूकपणे, नसा-नसांची काळजी घेत शस्त्रक्रिया पूर्ण केली. त्यांना बधिरीकरण तज्ज्ञ डॉ. राम हजारे, डॉ. भाग्यश्री भालेराव आणि डॉ. गौरव महाजन यांनी तितक्याच ताकदीने साथ दिली. शस्त्रक्रिया यशस्वी होताच, रुग्णाच्या कुटुंबियांच्या डोळ्यांत आलेले आनंदाश्रू हेच या कामगिरीचे खरे फलित होते.जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे आणि डॉ. अविनाश पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली आज जिल्हा रुग्णालय केवळ इमारत राहिली नसून, ते सामान्य माणसाचा 'आधारस्तंभ' बनले आहे. पूर्वी ज्या शस्त्रक्रियांसाठी लोकांना खासगी दवाखान्यात धाव घ्यावी लागत असे, त्या आज मोफत आणि दर्जेदार पद्धतीने आपल्याच वाशीममध्ये होत आहेत. अपेंडिक्स, गर्भाशयाचे विकार किंवा पित्ताशयाचे खडे यांसारख्या आजारांवर आता लॅप्रोस्कोपीद्वारे विनासायास उपचार मिळणे, ही गोरगरिबांसाठी मोठी सुखद बाब आहे.







वाशीम जिल्हा रुग्णालयाने आज केवळ वैद्यकीय सेवेचा दर्जा उंचावला नाही, तर 'सरकारी रुग्णालय म्हणजे केवळ कागदी घोडे नाचवणारी यंत्रणा' हा समज मोडीत काढला आहे. डॉक्टरांनी केवळ रुग्ण बरा केला नाही, तर एका कुटुंबाला पुन्हा नव्याने जगण्याचे बळ दिले आहे. या यशस्वी कामगिरीबद्दल संपूर्ण आरोग्य विभागासह सामान्य नागरिकांमधूनही डॉक्टरांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## २५ हजाराची लाच आली गळ्यात आदर्श सरपंच एसीबीच्या जाळ्यात !

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●



मालेगाव तालुक्यातील आदर्श ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेल्या ढोरखेडा येथील महिला सरपंचाला २५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ अटक करण्यात आली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) ४ जून रोजी ही धडक कारवाई केली.

आरोपी महिला सरपंच, ग्रामपंचायत ढोरखेडा, ता. मालेगाव लाचेची रक्कम: २५,००० रुपये. सापळा कधी रचला ३ जूनपासून या कारवाईसाठी एसीबीने नियोजन केले होते. ३ जून रोजी दुपारीच लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यात आली होती. कारवाई कधी झाली ४ जून रोजी सापळा यशस्वी करून महिला सरपंचाला रंगेहाथ पकडण्यात आले. सध्या याप्रकरणी पोलीस स्टेशन शिरपूर येथे गुन्हा दाखल करण्याची आणि पुढील कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू आहे. विशेष बाब एकीकडे तपासणी, दुसरीकडे लाचखोरी या कारवाईदरम्यान एक धक्कादायक आणि नाट्यमय प्रसंग पाहायला मिळाला. ज्यावेळी एसीबीने हा सापळा रचून सरपंचाला पकडले, नेमक्या त्याच वेळी 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' अंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील एक उच्चस्तरीय चमु या आदर्श ग्रामपंचायतच्या कामकाजाची तपासणी करत होती. एकीकडे आदर्श कारभाराचे मूल्यमापन सुरू असतानाच, दुसरीकडे सरपंच लाच घेताना पकडल्या गेल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे.

## घर पाडलं, कर्ज काढलं, काय करावे कळेना... पण घरकुलाचा दुसरा हप्ता मिळेना!



●दिपक मापारी @ रिसोड●



गरिबांना हक्काचे घर देण्याचा गाजावाजा करणाऱ्या पंतप्रधान मंत्री आवास योजनेचा रिसोड तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांसाठी सध्या मनस्तापाचा विषय बनला आहे. पहिला हप्ता म्हणून अवघे १५ हजार रुपये खात्यात जमा झाल्यानंतर दुसरा हप्ता मिळेल, या आशेवर लाभार्थ्यांनी जुनी घरे पाडली, कर्ज काढले, मुला-मुलींची लग्ने पुढे ढकलली आणि नव्या घराचे बांधकाम स्लॅबपर्यंत नेले. मात्र मागील सहा महिन्यांपासून दुसरा हप्ता न मिळाल्याने शेकडो कुटुंबे आर्थिक संकटात सापडली आहेत. शासनाकडून मिळणाऱ्या दीड लाख रुपयांच्या अनुदानाच्या भरोशावर अनेकांनी बांधकामात आणि अनिश्चिततेच्या छायेत दिवस काढत आहेत. पावसाळा काही दिवसांवर येऊन ठेपला असताना छप्पराविना राहण्याची वेळ लाभार्थ्यांवर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे बांधकामाची अट पूर्ण करूनही निधी का मिळत नाही, याचे स्पष्ट उत्तर प्रशासनाकडून दिले जात नसल्याची तक्रार लाभार्थी करीत आहेत. शासनाच्या विलंबामुळे अनेकांचे लाखो रुपये अडकले असून कर्जाचे हप्ते आणि व्याजाचा बोजा दिवसेंदिवस वाढत आहे. 'घरकुल मिळेल म्हणून जुनं घर पाडलं; आता ना जुनं घर राहिलं, ना नवीन घर पूर्ण होत आहे,' अशी आयुष्यभराचा निवारा असलेली जुनी पत्र्याची व खापराची घरे जमीनदोस्त केली. आज तीच कुटुंबे अर्धवट लोकसभा निवडणुकीपूर्वी रिसोड तालुक्यातील अनेक गावांमध्ये २० ते १२५ पर्यंत लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाले. पहिला हप्ता म्हणून १५ हजार रुपये खात्यात जमा झाल्यानंतर लाभार्थ्यांनी स्वतःचे पैसे खर्च करून तसेच कर्ज काढून घरबांधणीची कामे सुरू केली. अनेकांनी बांधकाम स्लॅब स्तरापर्यंत पूर्ण केले आहे. मात्र, मध्यंतरीच्या काळात निधीअभावी कामे रखडली. त्यातच वारंवार हंगामी अभियंते बदलल्याने लाभार्थ्यांना अधिक त्रास सहन करावा लागत आहे. सध्या निधी उपलब्ध असूनही तांत्रिक मंजुरी आणि बिल प्रक्रियेत टाळाटाळ होत असल्याची तक्रार लाभार्थ्यांकडून केली जात आहे. दरम्यान गटविकास अधिकारी आणि संबंधित प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी लाभार्थ्यांकडून केली जात आहे..

# साहेब, कामे न करता वित्त आयोगाचा निधी गायब !

*** भ्रष्टाचाराची चौकशी करा, अन्यथा आंदोलन * युवा सेनेचे जिल्हाप्रमुख प्रदिप मोरे यांचा इशारा**

●प्रभाकर नाईकवाडे @ रिसोड●

अंचळ ग्रामपंचायतीतील विविध विकासकामे, ई-ग्रामस्वराज पोर्टलवरील व्हाउचर आणि खर्चाच्या नोंदींमुळे निर्माण झालेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर अंचळसह केनवड व परिसरातील संबंधित ग्रामपंचायतींमधील विकासकामांची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी युवासेना जिल्हाप्रमुख प्रदीप पाटील मोरे यांनी केली आहे.

चौकशीत अनियमितता किंवा दोष आढळल्यास संबंधितांवर तात्काळ कारवाई करावी, अन्यथा युवासेना तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही त्यांनी प्रशासनाला दिला आहे. १४ वा वित्त आयोग, १५ वा वित्त आयोग तसेच विविध विकास योजनांअंतर्गत करण्यात आलेल्या कामांचा निधी, व्हाउचर, मोजमाप पुस्तिका (एमबी), अंदाजपत्रके आणि प्रत्यक्ष कामांची सखोल पडताळणी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.ई-ग्रामस्वराज पोर्टलवरील विविध खर्चाच्या नोंदी आणि नागरिकांकडून पुढे येत असलेल्या तक्रारींमुळे परिसरात संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून, दोषी आढळणाऱ्या संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी भूमिका युवासेनेने घेतली आहे.याबाबत बोलताना युवासेना जिल्हाप्रमुख प्रदीप पाटील मोरे म्हणाले, 'जनतेच्या पैशातून होणाऱ्या प्रत्येक विकासकामाचा हिशोब जनतेला मिळालाच पाहिजे. चौकशीत अनियमितता आढळल्यास कोणालाही पाठीशी न घालता कठोर कारवाई करण्यात यावी.

अन्यथा युवासेना लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडेल.' दरम्यान, अंचळ प्रकरणानंतर केनवड परिसरातील विविध गावांमधूनही नागरिक स्वतःहून माहिती, कागदपत्रे आणि व्हाउचर सिटी न्यूज सुपरफास्टकडे देत असल्याचे समोर येत आहे. या सर्व कागदपत्रांची पडताळणी करून वस्तुस्थिती जनतेसमोर मांडण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत असून, यासंदर्भातील वृत्तमालिका पुढील भागांत प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती मिळत आहे.

### केनवड परिसरातील गावागावात रस्त्यावर रस्ता, कामांवर काम; भ्रष्टाचारात करून गिळला दाम..?

केनवड परिसरातील विविध गावांमध्ये रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता तसेच इतर विकासकामांवर थातूरमातूर कामे पुन्हा दाखवून लाखो रुपयांचा निधी हडपल्याची चर्चा परिसरात रंगू लागली आहे. या कामांवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च झाल्याच्या नोंदी ई-ग्रामस्वराज पोर्टलवर दिसून येत आहेत. मात्र प्रत्यक्षात ही कामे दर्जेदार झाली आहेत का आणि मंजूर अंदाजपत्रकानुसार पूर्ण झाली आहेत का, याबाबत नागरिकांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. गावागावांतून विविध व्हाउचर, मोजमाप पुस्तिका (एमबी) आणि खर्चाच्या नोंदींबाबत माहिती पुढे येत असून, या सर्व कामांची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी होत आहे.केनवड परिसरातील गावागावांत अशाच प्रकारचा कारभार घडला आहे का, याबाबतही नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. अनेक विकासकामांवर खर्च दाखवून प्रत्यक्षात कामांची गुणवत्ता आणि अंमलबजावणी याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्यामुळे परिसरातील सर्व ग्रामपंचायतींच्या विकासकामांची, व्हाउचर, एमबी, अंदाजपत्रके आणि निधी खर्चाची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

शुक्रवार, दि. ५ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# गंगा-जमुना पाझर तलावाची भिंत दुरुस्त करावी

**अमडापूर :** अमडापूर ग्रामपंचायत हद्दी अंतर्गत गंगा-जमुना पाझर तलाव मागील वर्षी अतिवृष्टीमुळे पूर्ण क्षमतेने भरला होता. तसेच जंगली जनावरांनी भिंतीवरती खड्डे केल्याने दोन-तीन ठिकाणी भिंतीमधून पाणी पाझरत असल्याने हा पाझर तलाव फुटून त्याखाली असलेल्या शेत जमिनीचे व वडार वस्तीत पाणी जाऊन खूप मोठ्या प्रमाणामध्ये जीवित व वित्त हानी होऊ शकते. तसेच भिंतीवरील झाडे झुडपे वाढले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी केलेल्या मागणीनुसार याआधी २५ ऑग. २०२५ रोजी सरपंच सौ. वैशालीताई संजय गवई यांच्या अध्यक्षतेखाली ग्रा. पंचायत कार्यालय अमडापूरची ग्रामसभा / मासिक सभा ग्रा. पंचायत कार्यालयात आयोजित करून या विषयावर सविस्तर चर्चा होऊन ठराव घेण्यात आला होता. तसेच संबंधित सिंचन विभाग जिल्हा परिषद बुलढाणा यांनी या तलावाच्या भिंतीची दुरुस्ती लवकरात लवकर करून घ्यावी. जेणेकरून होणाऱ्या घटना टाळणे शक्य होईल. अशा सूचना दिल्या. होत्या. मागील वर्षी १९ ऑग. रोजी पाझर तलावाच्या भिंतीवरून पाणी उसळून पाणी वाहत होते व भिंत पडेल की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती.

# रोहित्राला झाडाच्या फांद्यांचा वेढा, अपघाताची शक्यता !

## ♦ झाडांच्या फांद्यांमध्ये हरवलेले खामगाव शहरातील विद्युत रोहित्र

प्रतिनिधी ५ जून



**खामगाव:** शहरातील टॉवर चौक परिसरात असलेले वीज रोहित्र झाडांच्या वाढलेल्या फांद्यांमध्ये अक्षरशः वेढले गेल्याचे चित्र दिसून येत आहे. रोहित्राच्या चारही बाजूंनी मोठ्या प्रमाणात फांद्या वाढल्याने संभाव्य दुर्घटनेची भीती व्यक्त केली जात असून, नागरिकांकडून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

टॉवर चौक हा शहरातील अत्यंत वर्दळीचा भाग असून या परिसरातून दिवसभर नागरिकांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. अशा ठिकाणी असलेले तीज रोदित्र यादांच्या फांद्यांनी पूर्णपणे झाकोळले गेले आहे. विशेषतः पावसाळ्यात या फांद्या वीजवाहिन्या किंवा रोहित्राच्या संपर्कात आल्यास शॉर्टसर्किट, वीजपुरवठा खंडित होणे किंवा गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महावितरणकडून शहरातील वीज यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती नियमितपणे केली जात असल्याचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात टॉवर चौकातील रोहित्राची स्थिती वेगळीच असल्याने या दाव्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. झाडांच्या फांद्यांची छाटणी न झाल्याने रोहित्र झाकले गेले असून, संभाव्य धोक्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# पोलीस भरती परीक्षेतील प्रश्नपत्रिकेबाबत विद्यार्थ्यांची नाराजी

## मुख्यमंत्री व गृहमंत्र्यांना विद्यार्थ्या मार्फत निवेदन

प्रतिनिधी ५ जून



**मलकापुर :** महाराष्ट्रभर सुरू असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेतील लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेबाबत अनेक स्पर्धा परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. पोलीस भरतीसाठी सामान्य ज्ञान, गणित, मराठी व्याकरण आणि रीजनिंग या विषयांवर आधारित २५-२५ प्रश्न अपेक्षित असताना प्रत्यक्ष प्रश्नपत्रिकेत मोठ्या प्रमाणात अभ्यासक्रमाबाहेरील वरील विषया पैकी अतिरिक्त प्रश्न टाकूनव अधिकाऱ्यांच्या विचारसरणीचा अंदाज लावावे लागतील अशा स्वरूपाचे प्रश्न विचारण्यात आल्याचा आरोप लीगल फायटर फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष ॲड . स्नेहल तायडे, व प्रा. नरेंद्र सुरळकर यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी निवेदन दिले आहे.

त्यावेळी विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे की, वर्षभर पोलीस भरतीच्या निर्धारित अभ्यासक्रमानुसार तयारी करूनही प्रश्नपत्रिकेत अपेक्षित विषयांना पुरेसे स्थान मिळाले नाही. परिणामी अनेक विद्यार्थ्यांना अन्याय झाल्याची भावना निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर लीगल फायटर फाउंडेशन यांच्या मार्गदर्शनाखाली असंख्य विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तसेच गृहमंत्री यांना निवेदन सादर केले आहे. निवेदनात पोलीस भरती परीक्षेतील प्रश्नपत्रिकेची तज्ज्ञ समितीमार्फत चौकशी करावी, अभ्यासक्रमानुसार प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे लागू करावीत आणि विद्यार्थ्यांवर अन्याय होणार नाही याची खबरदारी घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांनी राज्य शासनाकडे पोलीस भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक, न्याय्य आणि अभ्यासक्रमाधारित करण्याची मागणी केली असून या विषयाकडे तातडीने लक्ष देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, संबंधित निवेदनाची दखल घेऊन शासनाने योग्य निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा विद्यार्थी व पालक वर्गाकडून व्यक्त होत आहे.

# कागदपत्रांच्या वादातून दोन कुटुंबांत हाणामारी

## परस्परविरोधी तक्रारी; १२ जणांविरुद्ध गुन्हे दाखल

प्रतिनिधी ५ जून

**खामगाव:** शहरातील समर्थनगर परिसरात कागदपत्रांच्या वादातून दोन कुटुंबांमध्ये झालेल्या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. या प्रकरणात दोन्ही बाजूंनी एकमेकांविरुद्ध तक्रारी दाखल केल्याने खामगाव शहर पोलिसांनी एकूण १२ जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हे नोंदविले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ जून रोजी रात्री सुमारे ८ वाजता समर्थनगर, गजानन कॉलनी येथे हा प्रकार घडला. एका तक्रारीनुसार, सुलभा देवीदास गवई या कुटुंबासह घरी असताना विजय गवई, मनीषा विजय गवई, गोपाल मोरे, प्रदीप मोरे, संगीता मोरे व दीपक गवई यांनी संगनमत करून घरात प्रवेश केला. कागदपत्र चोरीच्या तक्रारीच्या कारणावरून शिवीगाळ करत फिर्यादी व तिच्या मुलाला मारहाण करण्यात आली. तसेच दोघांच्या हातावर चाकूने वार करून जखमी केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

दुसरीकडे, मनीषा विजय गवई यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्या आपल्या पती व आईसोबत समर्थनगर येथे गेल्या असता आकाश गवई, मंगेश गवई, देवीदास गवई, सुलभा गवई, मनीषा आकाश गवई आणि संतोषी गवई यांनी त्यांना शिवीगाळ करून मारहाण केली. फिर्यादीच्या आईचे केस ओढून धमकावण्यात आले तसेच फिर्यादी व तिच्या पतीला लाकडी काठीने मारहाण करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावेळी फिर्यादीच्या आईच्या पाठीवर वीट मारून दुखापत केल्याचेही तक्रारीत नमूद आहे. दोन्ही तक्रारींच्या आधारे खामगाव शहर पोलिसांनी स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत. पो.हे.कॉ. विनोद शेळके यांनी गुन्ह्यांची नोंद केली असून, पुढील तपास पो.हे.कॉ. मनोहर गोरे करीत आहेत.

# खामगाव नगर पालिकेच्या नोटिसांना केराची टोपली

## प्रतिबंधित जागाच बनली कचराकुंडी!

प्रतिनिधी ५ जून

**खामगाव:** शहरात स्वच्छता अभियानाला काही बेजबाबदार व्यावसायिक, विक्रेते आणि नागरिकांकडून खुलेआम हरताळ फासला जात आहे. नगरपालिकेच्या वारंवार सूचना, नोटिसा आणि दंडात्मक कारवाईच्या इशाऱ्यांनंतरही प्रतिबंधित ठिकाणी कचरा टाकण्याचे प्रकार थांबण्याऐवजी अधिकच वाढले आहेत. विशेष म्हणजे, जुन्या नगर पालिका इमारतीचा परिसर आणि नगरपालिकेने स्पष्टपणे प्रतिबंधित केलेल्या जागाच आता कचराकुंड्या बनल्या आहेत.

शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी नगरपालिकेकडून नियमित साफसफाई, जनजागृती मोहीम, सूचना फलक तसेच कचरा संकलनाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र, या सर्व उपाययोजनांना काही घटकांकडून अक्षरशः केराची टोपली दाखवली जातआहे. जुन्या नगर पालिका इमारतीच्या परिसरात प्लास्टिक, भाजीपाल्याचा कचरा, कागद, थर्माकोल आणि अन्य घनकचऱ्याचे ढीग साचत असल्याने परिसर अस्वच्छतेच्या विळख्यात सापडला आहे. या कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरत असून डास, माशा आणि भटक्या जनावरांचा त्रास वाढला आहे. परिणामी परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात निर्माण झालेली ही परिस्थिती नगरपालिकेच्या स्वच्छता प्रयत्नांवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरत आहे. नगरपालिकेने आता सीसीटीव्ही निरीक्षण, विशेष तपासणी पथके आणि दंडात्मक कारवाईचा इशारा दिला असून, नियम मोडणाऱ्यांवर कठोर पावले उचलली जाणार असल्याचे संकेत दिले.

**परिसरात अस्वच्छतेमुळे आरोग्य धोक्यात**

खामगाव शहरात विविध ठिकाणी साचलेल्या कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी, डास व माशांचा प्रादुर्भाव वाढत आहे. संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण होत असून, नागरिकांच्या आरोग्याची चिंता वाढली आहे. शहराची स्वच्छता आणि प्रतिष्ठा अबाधित राखण्यासाठी नागरिकांनीही जबाबदारीची जाणीव ठेवण्याची गरज व्यक्त होत आहे.

**नोटिसांकडे दुर्लक्ष, नियमांची पायमल्ली**

प्रतिबंधित ठिकाणी कचरा टाकू नये, यासाठी नगरपालिकेने अनेकदा सूचना आणि नोटिसा जारी केल्या. मात्र, काही व्यावसायिक व विक्रेते या आदेशांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असून, सार्वजनिक ठिकाणांनाच कचराकुंडी बनवत आहेत.

**मोकळ्या जागाच बनल्या कचराकुंड्या नगरपालिकेकडून घराघरात**

घंटागाडीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असतानाही अनेक नागरिक आणि काही व्यावसायिक त्याकडे दुर्लक्ष करत आहेत. घंटागाडीत कचरा देण्याऐवजी तो रस्त्यांच्या कडेला, मोकळ्या जागांमध्ये तसेच प्रतिबंधित ठिकाणी टाकला जात असल्याने अस्वच्छता पसरत आहे.

# नगराध्यक्षांकडून नगर परिषदेत विविध विभागांची झाडाझडती

## कार्यालयीन उपस्थिती व नागरिक सेवांची माहिती

प्रतिनिधी ५ जून



**खामगाव:** नागरिकांना अधिक कार्यक्षम, दर्जेदार व वेळेत सेवा उपलब्ध व्हाव्यात तसेच नगरपरिषदेच्या प्रशासकीय कामकाजात शिस्त, पारदर्शकता आणि गतिमानता कायम राहावी, या उद्देशाने नगराध्यक्ष अपर्णा फुंडकर यांनी बुधवारी खामगाव नगरपरिषद कार्यालयातील विविध विभागांची झाडाझडती घेत कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. नगराध्यक्ष फुंडकर यांनी नगरपरिषद कार्यालयातील विविध शाखांना भेट देऊन तेथील दैनंदिन कामकाजाची माहिती घेतली. यावेळी प्रलंबित प्रकरणांची संख्या, त्यावरील कार्यवाही, अभिलेखांची नोंद, कार्यालयीन उपस्थिती तसेच नागरिकांना दिल्या जाणाऱ्या विविध सेवांचा आढावा घेण्यात आला. अनेक विभागांतील नोंदवही, कार्यालयीन कागदपत्रे आणि सेवा वितरण प्रक्रियेचीही त्यांनी तपासणी केली. यावेळी संबंधित विभागप्रमुख व अधिकाऱ्यांशी चर्चा करताना नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यावर भर देण्यात आला. कोणतेही प्रकरण अनावश्यकपणे प्रलंबित ठेवू नये, नागरिकांना सेवांसाठी वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत तसेच शासनाच्या विविध योजना आणि सेवा वेळेत उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या.कार्यालयीन कामकाजात वेळेचे नियोजन, कर्मचारी उपस्थिती, अभिलेखांचे अद्ययावतीकरण आणि सेवा वितरणातील कार्यक्षमता याकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. प्रशासन अधिक लोकाभिमुख बनावे, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन नगराध्यक्षांनी केले.

# पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते अभियांत्रिकी महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

प्रतिनिधी ५ जून




**मलकापूर :** स्थानिक पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते अभियांत्रिकी महाविद्यालयात नुकताच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ अत्यंत उत्साही आणि भारावलेल्या वातावरणात संपन्न झाला. या वर्षीच्या अत्यंत प्रतिष्ठेच्या आणि कठीण मानल्या जाणाऱ्या जेईई ॲडव्हांस्ड २०२६ परीक्षेत तीन विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून मानाचा तुरा रोवला आहे.

या परीक्षेत विद्यार्थी तनय प्रदीप टेकाडे याने ओबीसी रँक १२० ओजस ज्ञानदेव कोलते याने ओबीसी रँक ३४० आणि पियुष नारायण फाळके याने ओबीसी रँक ४४२ प्राप्त करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या तिन्ही विद्यार्थ्यांनी आपल्या अफाट कर्तृत्वाने मलकापूर शहरासह संपूर्ण परिसराचे नाव देशभरात उंचावले आहे. अत्यंत मेहनतीने आणि जिद्दीने मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल, असा सूर याप्रसंगी उमटला.

या अभिमानास्पद यशाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या वतीने एका विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. अनिल खर्चे , उपप्राचार्य प्रा. संदीप खाचणे आणि आयक्यूएसी डीन प्रा. रमाकांत चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत यशस्वी ठरलेल्या तिन्ही गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणाऱ्या पालकांचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन जाहीर गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रमांचे कौतुक केले. महाविद्यालयाच्या वतीने सर्व उपस्थित पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि भावी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. या ऐतिहासिक यशाबद्दल संपूर्ण परिसर आणि शैक्षणिक क्षेत्रातून या यशस्वी विद्यार्थ्यांवर व त्यांच्या पालकांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# तालुक्यातील शेतकऱ्यांची शेती पंपाची लाईन किमान दहा तास देण्याच्या मागणी

## ♦ शिवसेना (उबाठा)चे उपकार्यकारी अभियंता यांना निवेदन



**मलकापुर:** तालुक्यातील शेतकऱ्यांना शेती पंपाची लाईन किमान दहा तास देण्याची मागणी शिवसेना (उबाठा) उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांच्या नेतृत्वात शिवसेना पदाधिकारी व शेतकऱ्यांनी उपकार्यकारी अभियंता खान यांना एका निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात नमूद केले आहे शेतकऱ्यांना कृषी पंपाची लाईन म.रा.वि.वि कंपनीने नवीन टाइमटेबल नुसार सहा तास केले आहे, सहा तासात शेतकऱ्यांचे मशागतीची काम पूर्ण होत नसल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांना किमान दहा तास लाईट देण्याची मागणी आज दि.४जून २६ रोजी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच विवरा - दसरखेड फिडर वरील शेतकऱ्यांची लाईट टाईम टेबल नुसार बंद होती, तरी मेंटेनेस मधून रविवार पर्यंत त्यांना लाईन देवून शेतकऱ्यांच्या शेतातील उभी पिके वाचविण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर गजानन ठोसर शिवसेना उपजिल्हाप्रमुख, राजेशसिंह राजपूत विधानसभा संघटक, हरीदास गणबास शिवसेना शहरप्रमुख, इम्रान लकी वाहतूक सेना शहरप्रमुख, अमीत राजपूत युवासेना उपतालुकाप्रमुख, सत्तार शाह विभागप्रमुख , रफिकभाई शाखाप्रमुख, सौरभ चोपडे, भुषण पाटील, प्रफुल पाटील, विलास चोपडे, चंद्रकांत बोरले, शंकर कडू, गजानन अंभोरे सह शिवसेना पदाधिकारी व शेतकऱ्यांच्या सह्या नमूद आहे.

# विद्युत खांब व रोहित्रांवर अनधिकृत जाहिरात फलकांविरोधात नांदुरा महावितरणचा इशारा

प्रतिनिधी ५ जून

**नांदुरा:** नांदुरा शहरातील विविध चौक, सार्वजनिक ठिकाणे तसेच महावितरणच्या अधिपत्याखालील विद्युत खांब व रोहित्रांवर अनधिकृतपणे जाहिरात फलक लावण्याचे प्रमाण वाढत असल्याने महावितरण प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली आहे. याबाबत महावितरणच्या नांदुरा शहर शाखेचे सहाय्यक अभियंता यांनी नगर परिषद प्रशासनाला पत्र देऊन आवश्यक कारवाईची मागणी केली आहे.

महावितरणने दिलेल्या पत्रानुसार, विद्युत खांब व रोहित्रांवर जाहिरात फलक लावल्यामुळे वीज यंत्रणांच्या सुरक्षिततेस बाधा निर्माण होत असून देखभाल व दुरुस्तीची कामे करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जीवितालाही धोका निर्माण होऊ शकतो. तसेच अशा फलकांमुळे विद्युत पुरवठ्यात अडथळे निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी तसेच संबंधित व्यक्तींनी महावितरणच्या मालमत्तेवर कोणत्याही प्रकारचे अनधिकृत जाहिरात फलक लावू नयेत, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच नगर परिषद प्रशासनाने अशा फलकांवर तातडीने कारवाई करून ते हटवावेत, अशी विनंतीही महावितरणकडून करण्यात आली आहे. या पत्राची प्रत नांदुरा पोलीस स्टेशन, विद्युत निरीक्षक कार्यालय खामगाव, कार्यकारी अभियंता (विभागीय कार्यालय मलकापूर) तसेच उपकार्यकारी अभियंता (उपविभागीय कार्यालय नांदुरा) यांनाही पाठविण्यात आली आहे.

महावितरणच्या या इशाऱ्यानंतर शहरातील अनधिकृत जाहिरात फलकांवर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# चोरीचा ऐवज मुळ मालकांच्या स्वाधीन

## साडेतीन लाखांचा मुद्देमाल शहर पोलिसांनी केला परत

प्रतिनिधी ५ जून

**खामगाव:** चोरी व घरफोडीच्या गुन्ह्यांचा यशस्वी तपास करून आरोपींकडून जप्त करण्यात आलेला लाखो रुपयांचा ऐवज मूळ मालकांना परत देत खामगाव शहर पोलिसांनी नागरिकांचा विश्वास अधिक दृढ केला आहे. मिशन परिवर्तन अंतर्गत राबविण्यात आलेल्या या कारवाईत विविध गुन्ह्यांतील दागिने व चांदीचा ऐवज हस्तगत करण्यात आला. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अपराध क्रमांक ३४९/२०२५ मधील २७०.६०० ग्रॅम वजनाचे चांदीचे शिक्के व चांदीची लगड, किंमत ३३ हजार ५५४ रुपये, अपराध क्रमांक १८४/२०२६ मधील ५८ हजार ४९७ रुपये किमतीचे सोन्याचे झुमके, तसेच अपराध क्रमांक २४८/२०२६ मधील १ लाख २८ हजार १९९ रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र आणि डोरले फिर्यादींना परत मिळाले. याशिवाय अपराध क्रमांक २५३/२०२६ मधील सोन्याचे लॉकेट, बदाम अंगठी व लाल खडा असलेली अंगठी असा सुमारे १ लाख रुपयांचा ऐवजही मालकांच्या ताब्यात देण्यात आला. या कारवाईमुळे एकूण सुमारे ३ लाख २० हजार रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल नागरिकांना परत देण्यात आला.वरिष्ठांच्या मार्गदर्शनात पोलिसांचा तपास पोलिस अधीक्षक नीलेश तांबे, अपर पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा आणि उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली खामगाव शहर पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने संबंधित गुन्ह्यांचा सखोल तपास करून आरोपींना जेरबंद केले. त्यांच्याकडून जप्त करण्यात आलेला मुद्देमाल पोलिस निरीक्षक रामकृष्ण पवार यांच्या उपस्थितीत फिर्यादींना सुपूर्द करण्यात आला. त्यामुळे संबंधितांना काही अंशी दिलासा मिळाला.

# नांदुरा तालुक्यात दोन तरुणी बेपत्ता; पालकांमध्ये चिंतेचे वातावरण

**नांदुरा:** नांदुरा तालुक्यातील दोन स्वतंत्र घटनांमध्ये दोन तरुणी बेपत्ता झाल्याची नोंद नांदुरा पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पोलिसांनी दोन्ही प्रकरणांचा तपास सुरू केला आहे. अल्पावधीतच दोन तरुणी बेपत्ता झाल्याच्या घटनांमुळे तालुक्यातील पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

पहिल्या घटनेत, वसाडी बु. येथील २२ वर्षीय तरुणी नांदुरा शहरात उपचारासाठी आल्यानंतर संशयास्पदरीत्या बेपत्ता झाली. कुटुंबीयांसोबत घरी परतत असताना राणा बेकरी परिसरात चॉकलेट घेण्यासाठी जात असल्याचे सांगून ती तेथून निघून गेली. मात्र बराच वेळ उलटूनही ती परत न आल्याने कुटुंबीयांनी शहरात तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला. तरीही तिचा ठावठिकाणा लागला नसल्याने पोलिसांत बेपत्ता असल्याची तक्रार दाखल करण्यात आली. दुसऱ्या घटनेत, खरकुंडी येथील २१ वर्षीय तरुणी शिक्षणाच्या निमित्ताने बुलढाणा येथे जाण्यासाठी नांदुरा बसस्थानकावरून बसमध्ये बसली होती. मात्र ती नियोजित ठिकाणी पोहोचली नसून संध्याकाळपर्यंत घरीही परतली नाही. तिच्या मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता फोन बंद असल्याचे आढळून आले. नातेवाईकांनी विविध ठिकाणी शोध घेतल्यानंतरही ती आढळून न आल्याने पोलिसांत बेपत्ता प्रकरणाची नोंद करण्यात आली.

तालुक्यात सलग दोन तरुणी बेपत्ता झाल्याच्या घटनांमुळे पालक वर्गामध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. आपल्या पाल्यांच्या सुरक्षिततेबाबत अधिक दक्ष राहण्याची गरज असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. दोन्ही प्रकरणांमध्ये नांदुरा पोलिसांनी मिसिंगची नोंद करून शोधमोहीम सुरू केली असून संबंधित तरुणींबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास तात्काळ नांदुरा पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शुक्रवार, दि. ५ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी सुरू

## ■ जिल्हा अधीक्षक ,भूमि अभिलेख भारती खंडेलवाल यांची माहिती

प्रतिनिधी ५ जून




**अकोला :** भूमी अभिलेख उपसंचालक किंवा जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या अधिकृत आदेशानंतर अकोला भूमी अभिलेख कार्यालयाचे तत्कालीन उप अधीक्षक भूमि अभिलेख पंकज पवार यांच्या विरोधात पोलिसांत एफआयआर (गुन्हा) दाखल करण्यात आला आहे. पुणे कार्यालयामार्फत करण्यात आलेल्या विशेष तपासणीनंतर हे आदेश देण्यात आले होते, अशी माहिती भूमि अभिलेख विभागाच्या जिल्हा अधीक्षक भारती खंडेलवाल यांनी दिली. या प्रकरणात इतर काही कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे का, याची पडताळणी करण्यासाठी त्यांची विभागीय चौकशी देखील सुरू करण्यात आली आहे. असे ही त्यांनी सिटी न्यूज सुपरफास्ट सोबत बोलताना सांगितले.

उप अधीक्षक पंकज पवार याने केलेला गैरप्रकार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संमतीशिवाय किंवा पाठिंब्याशिवाय शक्य आहे का?' असा प्रश्न विचारला असता, जिल्हा अधीक्षक खंडेलवाल यांनी स्पष्ट केले की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम १४९ आणि १५० अन्वये फेरफार प्रमाणित करण्याचे सर्व अधिकार पूर्णतः संबंधित कायद्यानुसार त्या अधिकाऱ्याच्या अखत्यारीत असतात. या प्रक्रियेसाठी त्यांना कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्याच्या पूर्वसंमतीची किंवा स्वाक्षरीची कायदेशीर आवश्यकता नसते. त्यामुळे पवार यांनी घेतलेले निर्णय आणि त्यांच्या स्वाक्षरीने झालेले फेरफार हे त्यांच्याच कार्यकक्षेत झाले आहेत. त्यामुळे फेरफार प्रकरणात सर्वस्वी पंकज पवार हे सर्वस्वी जबाबदार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

मूळ लेआऊटचे नकाशे भूमी अभिलेख विभागाकडे नसतात, तर विभागाकडे केवळ 'मोजणीच्या शिटा' असतात. कार्यालयातील सर्व मोजणी शिटा पूर्णपणे सुरक्षित असून, विभागाकडील संपूर्ण अभिलेख स्कॅन आणि डिजिटाईज करण्यात आला आहे. त्यामुळे कोणतेही दस्तऐवज गायब झालेले नाहीत.'शासकीय लोकसेवकाचे मुख्य कर्तव्य हे शासकीय नियमांचे काटेकोर पालन करणे हेच असते,' असे सांगत खंडेलवाल यांनी स्पष्ट केले की, सध्या पुणे कार्यालयाच्या आदेशानुसार मुख्य संशयितावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.या प्रकरणात इतर कोणी सहभागी आहे काय हा पोलिस तपासाचा भाग आहे. असे ही जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख भारती खंडेलवाल म्हणाल्या.

# जुना कापड बाजारातील खड्डा अजूनही तसाच

## ♦ मागील वर्षी एक व्यक्ती वाहूनही प्रशासन ढिम्म



प्रतिनिधी ५ जून

**अकोला :** महापालिका प्रशासनाचा अक्षम्य निष्काळजीपणा आणि दुर्लक्षामुळेच गेल्या पावसाळ्यात शहरातील सर्वात गजबजलेला टिळक रोड, विदर्भ केसरी ब्रिजलाल बियाणी चौक, जुना कापड बाजारातील नाल्याचा खड्डा उघडा राहिल्याने ओसंडून वाहत होता. ज्यामध्ये एक व्यक्ती पडून दूरपर्यंत वाहून गेला आणि दुसऱ्या दिवशी त्याचा मृतदेह सापडला होता. गेल्या वर्षीच्या घटनेतून प्रशासनाने धडा घेतलेला नाही. या बाबतीत आश्चर्य वाटत आहे.

त्या अपघातानंतर प्रशासन आणि नेतेमंडळी खडबडून जागे झाले. त्यांनी दुःखही व्यक्त केले. पण खेदाची गोष्ट म्हणजे हा जीवघेणा नाला आणि खड्डा आजही भयानक रूप धारण करून तशाच स्थितीत आहे. संबंधित अधिकारी आणि प्रशासन प्रमुखांचे दुर्लक्ष अजूनही कायम आहे आणि आता पुन्हा पावसाळा जवळ आला आहे. अपेक्षा एवढीच आहे की, पावसाळ्यापूर्वी केल्या जाणाऱ्या नालेसफाईच्या कामांसोबतच या जीवघेण्या खड्ड्याचा तात्काळ बंदोबस्त केला जावा; अन्यथा, पुन्हा एखादी गंभीर दुर्घटना घडण्याची दाट शक्यता आहे.

# खामगावात तरुणावर चाकूहल्ला ; चौघांविरुद्ध गुन्हा


प्रतिनिधी ५ जून

**खामगाव :** तालुक्यातील सारोळा येथील एका तरुणावर चाकूने हल्ला करून मारहाण केल्याची घटना ३ जून रोजी सायंकाळी घडली. या प्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सारोळा येथील रहिवासी विकास हरिचंद्र जाधव हे ३ जून रोजी सायंकाळी सुमारे ७:३० वाजता दुचाकीने घरी जात होते. चिखली रोडवरील एका पेट्रोल पंपाजवळ असलेल्या विजय पान पॅलेससमोर त्यांना पांडुरंग निंबाजी चव्हाण, प्रकाश निंबाजी चव्हाण, किशोर रोहिदास चव्हाण व विठ्ठल निंबाजी चव्हाण (सर्व रा. सारोळा) यांनी अडविले. यावेळी चौघांनी विकास जाधव यांना चापटाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच किशोर रोहिदास चव्हाण याने चाकूने हल्ला करून त्यांच्या खांद्यावर व तळहातावर वार केल्याने ते जखमी झाले. या घटनेप्रकरणी विलास हरिचंद्र जाधव यांनी खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली.फिर्यादीच्या तक्रारीवरून पांडुरंग निंबाजी चव्हाण, प्रकाश निंबाजी चव्हाण, किशोर रोहिदास चव्हाण व विठ्ठल निंबाजी चव्हाण यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१), ३५२ व १३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास एएसआय भगवान काळबागे करीत आहेत.

# भीमनगर होजियरी मिल भागात रहिवाशांच्या आरोग्याशी खेळ

## पाणी वाहून जाण्यासाठी जागाच नाही मनपा प्रशासन लक्ष देईल का

प्रतिनिधी ५ जून



**अकोला :** भीमनगर होजियरी मिल भागातील रहिवासी प्रचंड यातना सहन करीत आहेत. या भागात सांडपाणी वाहून नेण्यासाठी नाली नाही. त्यामुळे रस्त्याच्या बाजूला डबके साचले आहे. विचित्र स्थिती या ठिकाणी पाहायला मिळते. नगर सेवकही लक्ष देत नाहीत. त्यामुळे निदान महापालिका प्रशासनाने तरी ही समस्या सोडवावी अशी मागणी आहे. कारण पावसाळ्यात तर नागरिकांना खूप त्रास सहन करावा लागतो. साचलेले पाणी रस्त्यावर वाहते. ही समस्या सुटणे आवश्यक आहे सांडपाणी व्यवस्थापन नाही ही समस्या केवळ या भागात नाही तर विविध भागात हा प्रश्न आहे. भीमनगर होजियरी मिल भागात ही समस्या उग्र बनली आहे. अजय रामटेके नगर सेवक असताना साचलेले पाणी उपसण्यासाठी पुढाकार घेत होते. परंतु आता हा भाग दुर्लक्षित असल्याचा आरोप या परिसरातील नागरिक करीत आहेत. महापालिका आरोग्य विभागाने या भागाची पाहणी करून तातडीने प्रश्न सोडवावा अशी मागणी केली जात आहे.

# निवडणुकीत नियमांचे काटेकोर पालन व्हावे

## राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे पातूर येथे मतदान केंद्रे व स्ट्रॉंगरूमची पाहणी

प्रतिनिधी ५ जून



**अकोला :** पातूर नगरपरिषद तसेच आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण निवडणूक यंत्रणा सक्षम, सज्ज आणि सतर्क ठेवावी. प्रत्येक नियमाचे काटेकोर पालन होणे अत्यावश्यक आहे, असे स्पष्ट निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले. जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणूक तयारी व आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने आढावा त्यांनी घेतला. यावेळी आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, जिल्हाधिकारी वर्षा मीना, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, न. प. प्रशासन सहआयुक्त विश्वनाथ वडजे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पातूर व अकोट नगरपरिषद निवडणुकांच्या अनुषंगाने मतदान केंद्रांची तयारी, मनुष्यबळाचे नियोजन, तसेच आवश्यक साधनसामग्री यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. आगामी ग्रामपंचायत व इतर निवडणुकांसाठी आरक्षण सोडत, प्रशिक्षण प्रक्रिया आणि यंत्रणा अधिक सक्षम करण्यावरही विशेष भर देण्याचे निर्देश देण्यात आले. दरम्यान, आयुक्तांनी पातूर येथे प्रत्यक्ष भेट देऊन मतदान केंद्रे व स्ट्रॉंगरूमची पाहणी केली. न. प. मराठी शाळा क्र. १ येथील मतदान केंद्राला त्यांनी दिली. पातूर येथे त्यांनी मतदान कर्मचाऱ्यांशी संवाद साधला व निवडणूक प्रक्रियेतील बारकावे समजावून सांगितले. निवडणुकीदरम्यान कोणत्याही प्रकारचे गैरप्रकार घडता कामा नये. आचारसंहितेचे काटेकोर पालन करून निवडणुका शांततापूर्ण, पारदर्शक आणि निष्पक्ष वातावरणात पार पाडाव्यात, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्तांनी दिले.

# कांबळे यांच्या माघारीने खळबळ ; महाविकास आघाडीचे आंदोलन

प्रतिनिधी ५ जून



**यवतमाळ :** स्थानिक प्राधिकरण मतदारसंघाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार साहेबराव कांबळे यांनी ऐनवेळी उमेदवारी मागे घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या निर्णयाविरोधात महाविकास आघाडीने गुरुवारी शहरातील दत्त चौकात निदर्शने करत तीव्र निषेध व्यक्त केला. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आरोप केला की, उमेदवारी मागे घेण्याचा निर्णय घेताना कांबळे यांनी आघाडीतील कोणत्याही घटक पक्षाला विश्वासात घेतले नाही. उलट विरोधी पक्षातील काही नेत्यांच्या उपस्थितीत त्यांनी माघार जाहीर केल्याने या निर्णयामागे राजकीय दबाव किंवा इतर कारणे असावीत, अशी शंका व्यक्त करण्यात आली. आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी महायुती सरकारवर निशाणा साधत लोकशाही प्रक्रियेला बाधा पोहोचविण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप केला. आर्थिक प्रलोभने आणि दडपशाहीच्या माध्यमातून निवडणुकीवर प्रभाव टाकण्यात आल्याचा दावा करत कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. दत्त चौकात झालेल्या आंदोलनात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेंद्र गायकवाड, संपर्कप्रमुख किशोर इंगळे, संजय ठाकरे, जितेंद्र मोघे, राहुल ठाकरे, आरिज बेग, संजय वानखेडे, बबलू देशमुख, वैशाली सवई, कुणाल जानकर, शशांक केंढे, सय्यद रियाझ, कुशाल ठाकरे, रहमान शाह, जयराम मुनेश्वर, संजय महल्ले यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आंदोलनाची माहिती काँग्रेस सोशल मीडिया समितीचे जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनातून दिली.

# लोकेश चंद्र यांना महा आयकॉन पुरस्कार

## ♦ केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान



प्रतिनिधी ५ जून

**अमरावती :** मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचा विजेच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल 'महा आयकॉन २०२६' हा जीवनगौरव पुरस्कार देऊन पुढारी' माध्यम समूहातर्फे गौरव करण्यात आला. केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्गमंत्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते मुंबईत गुरुवारी हा पुरस्कार देण्यात आला.

राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, प्रसिद्ध शास्त्रज्ञ अनिल काकोडकर, पुढारी समुहाचे मुख्य संपादक . प्रतापसिंह जाधव आणि संपादक . योगेश जाधव मंचावर उपस्थित होते. महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीत आणि राष्ट्राच्या उभारणीत मोलाचे योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी 'पुढारी' माध्यम समूहाने 'महा आयकॉन २०२६' या नव्या उपक्रमाचे आयोजन केले होते.

# म्हैसांग परिसरातील वीज पुरवठा वारंवार खंडित

प्रतिनिधी ५ जून

**अकोला :** आधीच उकाड्याने हैराण झालेल्या म्हैसांग व परिसरातील नागरिकांना वारंवार होणाऱ्या खंडित वीज पुरवठ्याचाही त्रास सहन करावा लागत आहे. त्यातच आता पावसाळ्याचे दिवस समोर असल्याने निदान पावसाळ्यापूर्वी तरी ही समस्या कायमस्वरूपी मार्गी लावावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. रात्री बेरात्री केव्हाही अचानक वीज पुरवठा जात असल्याने नागरिकांना संपूर्ण रात्रच अंधारात काढावी लागत आहे. संबंधितांना फोनवरून माहिती देण्याचा प्रयत्न केला असता कोणीच प्रतिसाद देत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. ही समस्या न सोडविल्यास आम्हाला रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.






# बुलडाणा, अमरावतीसह पाच आधुनिक संत्रा प्रक्रिया प्रकल्पांना मान्यता

## ♦ चार कोटींच्या प्रकल्पांसाठी ५० टक्के शासकीय अनुदान

प्रतिनिधी ५ जून



**अकोला :** आधुनिक संत्री प्रक्रिया केंद्र उभारणे, या महत्त्वाकांक्षी योजनेंतर्गत बुलडाणा, अमरावती आणि नागपूर जिल्ह्यांतील पाच विविध ठिकाणच्या प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पांच्या प्रस्तावांना सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने अखेर राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली. यामुळे विदर्भातील संत्री उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, या मंजुरीमुळे विदर्भातील संत्री उत्पादक पट्ट्यात अत्याधुनिक प्रक्रिया केंद्रांचे जाळे निर्माण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शासनाने जारी केलेल्या निर्णयानुसार, प्रत्येकी ४ कोटी रुपये खर्चाच्या खालील पाच संस्थांच्या प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये कृष्णार्पण फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, मोर्शी (जि. अमरावती), कृषी उत्पन्न बाजार समिती, नागपूर, बुलढाणा अर्बन फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, संग्रामपूर (जि. बुलढाणा), कृषी उत्पन्न बाजार समिती, काटोल (जि. नागपूर) आणि कृषी उत्पन्न बाजार समिती, कळमेश्वर (जि. नागपूर) यांचा समावेश आहे. मंजूर झालेल्या सर्व प्रकल्पांची किंमत प्रत्येकी ४ कोटी रुपये आहे. लाभार्थी संस्थेला पहिल्यांदा स्वतःचा किमान १५ टक्के स्वनिधी खर्च करावा लागेल. उर्वरित ८५ टक्के रक्कम बँकेकडून कर्ज स्वरूपात उभारणे आवश्यक राहील. प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ प्रत्यक्ष पाहणी करून बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देईल. हा दाखला सादर केल्यानंतर शासनाकडून प्रकल्प किमतीच्या कमाल ५० टक्के मर्यादित (जास्तीत जास्त २ कोटी रुपये) अनुदान पणन मंडळामार्फत थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केले जाईल. निविदा प्रक्रियेत जर शासनाने निश्चित केलेल्या किमतीपेक्षा कमी किमतीची निविदा मंजूर झाली, तर त्या मंजूर निविदा रकमेच्या ५० टक्केच अनुदान अनुज्ञेय राहील. प्रक्रिया केंद्रासाठी लाभार्थ्यांकडे स्वतःची किंवा किमान ३० वर्षांच्या दीर्घ मुदतीची भाडेतत्त्वावरील जागा असणे बंधनकारक आहे, जी शासनाकडे गहाण राहील.

### पुणे कृषी पणन मंडळ नोडल एजन्सी

◆या संपूर्ण योजनेसाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे हे नोडल एजन्सी म्हणून काम पाहत आहे. प्रशासकीय मंजुरी मिळाल्यामुळे आता लाभार्थी संस्थांना त्वरित निविदा प्रक्रिया राबवून कंत्राटदाराची नियुक्ती करावी लागणार आहे. चालू आर्थिक वर्ष म्हणजेच सन २०२६-२०२७मध्येच या प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पांचे काम पूर्ण करण्याचे कडक आदेश शासनाने दिले आहेत. तसेच, प्रकल्पाचा दैनंदिन खर्च, वीज-पाणी देयके, देखभाल व मनुष्यबळाचा खर्च संबंधित संस्थांनाच करावा लागणार असून, त्यासाठी शासनाकडून कोणताही अतिरिक्त निधी मिळणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.







हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK